
मधू शिरगांवकर
प्रतिबिंब

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# प्रतिबिंब

(गूढकथा)

## लेखिका : मधू शिरगांवकर

# प्रतिबिंब

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्रतिबिंब (pratibimb) (गूढकथा)

लेखिका : मधू शिरगांवकर

Plot 13, Mangaldham, Pune 411038

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 09822208197

ई मेल -- madhushirgaonkar@gmail.com

मुखपृष्ठ : साधना शिरगांवकर व कनका जोशी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ जून २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखिकेची ओळख



सौ मधू शिरगांवकर ,वय ५३वर्षे .

पेशाने फार्मास्युटिकल ट्रेनर आणि कन्सल्टंट .

पती, सासू सासरे, दोन मुले व आईवडील यांच्यासह गेली २७ वर्षे पुण्यात वास्तव्य.

पन्नासाव्या वर्षी लेखनास सुरवात केली. लेखन करतानाचा आनंद सर्वात महत्वाचा आणि वाचकांची दाद ही सगळयात मोठी पावती असं मानते.

वाचता वाचताच लेखनाची सुरवात झाली. जवळपास ३० लघुकथा, पाच दीर्घकथा, अनेक ललित लेख, व सध्या एका कादंबरीचे लेखन सुरू आहे.

E mail : madhushirgaonkar@gmail.com

Mobile number: 9822208197

# मनोगत

आयुष्य वहातच असतं, जसं आपलं तसंच बऱ्याच इतरांचंही. सगळ्यांची आयुष्यं आपल्याला दिसत नाहीत पण मध्येच कधीतरी आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात.

ही कथा लिहीताना असेच काही विचार मनात घोळत होते. अंधश्रद्धा नसावीच एखाद्या गोष्टीविषयी, पण अशा अस्तित्वांना सरसकट नाकारू नये असं वाटतं.

कथा संपूर्ण काल्पनिक आहे, पण त्यामागचा विचार, त्यासाठी केलेला अभ्यास, संपूर्ण खरा आहे.

भयकथा या प्रकारात मोडणारी ही कथा, पण तरीही शास्त्रशुद्ध रितीने या सगळ्याचा विचार करण्याचा प्रयत्न केलाय.

प्रकाशित होणारी ही माझी पहिलीच दीर्घकथा. तुमच्यापर्यंत इ साहित्यने पोहोचवण्याचे ठरवले यासाठी मी इ साहित्य ची शतश: आभारी आहे!

पन्नाशी गाठेपर्यंत कधीच लेखनाचा विचार नव्हता आला माझ्या मनात.

श्री प्रियदर्शन मनोहर यांनी स्थापन केलेला व श्री मिलिंद केळकर यांनी मला आमंत्रित केलेल्या 'माझा मराठीचा बोल' (मामबो) या फेसबुकवरच्या समुहामुळे प्रथम लेखनाला सुरूवात झाली. हळूहळू मामबोच्या सतत प्रोत्साहन देणाऱ्या सदस्यांमुळे लिहिती झाले. त्यामुळे ही पहिली दीर्घकथा मी मामबो समुहाला समर्पित करत आहे.

आमचे दादा, डॉ. विवेक देशपांडे यांनी वेळोवेळी दिलेल्या मौलिक सूचना, अभिप्राय यांमुळे मला लेखनात अनेक सुधारणा करण्यास वाव मिळाला.

गिरीश गोगटे याने वेळात वेळ काढून मुद्रित शोधन केल्याने या कथेतले बरेच दोष कमी झाले आहेत. इतर अनेक बाबतीतही त्याचे अमूल्य सहकार्य लाभले.

सौ. प्रिया साठे हिने वेळोवेळी लागेल ती मदत केली.

माझी कन्या साधना शिरगांवकर व मानसकन्या कनका जोशी या दोघींनी माझ्या मनातील ‘प्रतिबिंब’ कागदावर चितारून या कथेला एक वेगळाच आयाम दिला.

लेखन हे एक अत्यंत वेळखाऊ काम आहे. माझ्या एकत्र कुटुंबपद्धतीतील कुटुंबियांनी हा वेळ मला उपलब्ध करून दिला.

सौ. अर्चना बोरोटीकर हिने ई साहित्यविषयी माहिती दिली, तिचेही मन:पूर्वक आभार!

नवलेखकांचे लेखन योग्य संस्कारांसह योग्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याची ई साहित्य ची तळमळ, सहज सोपी कार्यपद्धती, आणि त्यासाठी घेत असलेले कष्ट हे फार कौतुकास्पद आहेत. त्यासाठी त्यांचे पुनश्च  आभार !

आज माझी ही पहिली दीर्घकथा वाचकांसमोर ठेवताना मला अत्यंत आनंद होत आहे.

मधू शिरगांवकर

E mail : madhushirgaonkar@gmail.com


Mobile number: 9822208197

माझी ही प्रकाशित होणारी पहिली दीर्घकथा,

ज्यांचामुळे मी लिहिती झाले त्या

## 'माझा मराठीचा बोल'

या समूहाच्या सतत उत्तेजन देणाऱ्या सर्व सभासदांना अर्पण


Ghosts are those memories that are too strong to be forgotten for good, echoing across the years and refusing to be obliterated by time.
Caitlin R. Kiernan

# प्रतिबिंब

## प्रतिबिंब

### भाग १

शेवटी कशीतरी आठवड्याभराची सुट्टी काढून यश आणि जाई शिवपुरीस आपल्या जुन्या संस्थानी जायला निघाले. रावसाहेब जाऊनही चार महिने होऊन गेलेले. वकिलाचे दहादा फोन येऊन गेले. पण यशच्या कामाच्या व्यस्ततेने फुरसत मिळत नव्हती.

शेवटी वकिलाने आता आला नाहीत तर सर्व सरकारजमा होईल आणि नंतर काहीच हाती लागणार नाही असे निकराचे सांगताच जाण्याशिवाय पर्यायच उरला नाही. यशच्या मते तसेही तिथे जुन्या पुराण्या वास्तुशिवाय काही नव्हतेच.

वकिलास सांगून विकून टाकावे असे त्याने बोलूनही दाखवले पण जाताना सासऱ्यांनी दहा वेळा जाईस एकदा तरी शिवपुरी जाऊन यावे मग जो वाटेल तो निर्णय घ्यावा असे परोपरीने कळवळून सांगितलेले तिच्या मनातून जाईना. शेवटी तिने कसेतरी यशला तयार केले आणि जाण्यासाठी दोघे निघाले तर होते. काही अंतर गेल्यावर यशला सतत कामाचे फोन येऊ लागले मग जाईने गाडीचे चक्र हाती घेतले. गुगलभाऊ हाताशी होतेच त्यामुळे फारसा प्रश्न नव्हता. गाडी चालवताना नेहमीप्रमाणे जाईची तंद्री लागली.

सात वर्षांपूर्वी उच्च शिक्षण घेऊन जाई नोकरीसाठी अर्ज करू लागली. बहुतेक मुलाखतींमधे निवड व्हायचीच पण हिला काही ना काही खटकायचे. मग एक दिवस यशच्या फर्ममधून मुलाखतीसाठी बोलावणे आले. जाई मुलाखतीसाठी गेली ती नोकरीत रुजू होऊनच परत आली. तिच्या डॅडना आश्चर्यच वाटले. पण फार वाट पहावीच लागली नाही. बोलघेवड्या जाईच्या तोंडून नेहमीप्रमाणे दिवसभराचा वृतांत ऐकतानाच फर्मपेक्षा फर्मवाल्यानेच तिच्या मनी घर केले आहे हे त्या चाणाक्ष पित्याच्या लगेच ध्यानी आले. नोकरी सुरू झाली. प्रथमदर्शनी आकर्षणाचे रोजच्या सहवासाने प्रेमात आणि पुढे दोन वर्षांनी विवाहात रुपांतर झाले तेव्हा हे

होणे अटळच होते असे त्या दोघांना ओळखणाऱ्या सर्वांनाच वाटले. रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचा यश आणि  नाजूक, आकर्षक, स्मार्ट जाई एकमेकांना अगदी अनुरूप होते.

रावसाहेब मोठा तालेवार माणूस. संस्थानिक पुत्र असूनही आधुनिकतेची कास धरत, स्वत: शहर तसेच गावी दोन्हीकडे वास्तव्य ठेवत, संस्थानाच्या शेतजमिनीतून सोनं पिकवून दरवर्षी उत्पन्नात भरच घालत गेले. पण मग यशची आई अर्ध्या संसारातून अवघ्या चार दिवसाच्या तापाचे निमित्त होऊन गेली. यश तेव्हा शहरात हॉस्टेलमधे राहून शिकत होता. रावसाहेबांनी हळूहळू इथला गाशा गुंडाळून शहरात कायमच्या वास्तव्यासाठी जाण्याची तयारी सुरू केली. यशचे शिक्षण संपल्यावर त्याने शहरातच ऑफीस  थाटले आणि लेकासह रावसाहेब शहरी कायमचे स्थायिक झाले. यशच्या लग्नानंतर अनेकदा रावसाहेबांनी सुचवूनही आज जाऊ उद्या जाऊ असे करत जाईस शिवपुरीस नेणे राहूनच गेले. यशची ते करण्याची निरीच्छा आईच्या अकाली जाण्याने असावी असा जाईचा कयास होता. म्हणून तिनेही कधी फार आग्रह धरला नाही. रावसाहेब एकटेच वर्षातून एक दोन वेळा जाऊन  तिथली व्यवस्था लावून येत. सहा महिन्यांपूर्वी अचानक त्यांना पक्षाघात झाला आणि ते ही थांबले. अवघ्या दोन महिन्यात, उंचापुरा माणूस होत्याचा नव्हता झाला. शहरी औषधोपचार, प्रेमळ सून असे असूनही रावसाहेबांनी मनानेच जगण्याची इच्छाच सोडून दिल्यामुळे की काय जीवनज्योत मालवलीच. परंतु या दोन महिन्यात कित्येक वेळा त्यांनी जाईस शिवपुरी जाऊन येण्याबद्दल बजावून  बजावून  सांगितले. सासऱ्याची ही अंतिम इच्छा पूर्ण करायचीच असे तिने मनोमन ठरवले.

समोर आगगाडीचे बंद फाटक लागले तशी जाईने गाडी थोडी अलिकडेच थांबवली. उतरून दोघांनी चेहऱ्यावर पाणी मारून, थर्मासमधील कॉफी आणि सँडविचचा समाचार घेतला.फोनची रेंज नसल्याने यशचे काम आपसूकच थांबले. त्याने चक्राची सुत्रे आपल्या हाती घेतली. तासाभरात शिवपुरीची हद्द लागली.  जाई कुतुहलाने बाहेरचा परिसर न्याहाळू लागली.

लहानसंच पण टुमदार गांव. जवळपास सगळीच धाब्याची घरं. क्वचित काही दुमजली. बहुतेक सर्व घरांना कोयनेलची कुंपणं. दाराशी छोटी मोठी फुलांची झुडपं. बहुतेक सगळया घरांना जरा भडक रंगानीच रंगवलेलं. भिंतींवर घरातील स्त्रियांनी वेलबुट्टी रंगवलेल्या. रंग जरा भडक असले तरी रंगसंगती आकर्षक, त्यामुळे उठून दिसणारी. दरवाजे ठराविक कमानीवाले. एकंदरच तो घरांचा वेगळा बाज जाईला अतिशय आवडला. पाहता पाहता गाडी वाड्याच्या दारात पोहोचली. वाडा कसला एक छोटेखानी किल्लाच तो. चारी बाजूंनी बाहेरून उंच भिंत बांधून घेतलेली. या भिंतीतच समोरच्या बाजूला तीन माणूस उंचीचा भलामोठा दरवाजा आणि त्यातच एक लहान दिंडी दरवाजा. गाडी दरवाजापाशी आली. वकिल आणि शिवा, त्यांचा जुना नोकर बाहेरच थांबलेले. गाडी बाहेरच लावावी असे वकिलाने सुचवले कारण एवढा मोठा दरवाजा एकट्या शिवाला या वयात उघडणे शक्य नव्हते. शिवाने मग दिंडी दरवाजा उघडला. उघडताना त्याचा कर्र कर्र आवाज झाला. एखाद्या हॉरर फिल्मचे शुटींग मस्त होईल इथे असे जाईला वाटले.



"छोटे धनी, दिवाणखाना, अन् खालच्या झोपायच्या खोल्या, काल साफ करून घेतल्यात. रखमा यिल यवड्यात मंग गरम गरम भाकर अन् सुकं पिटलं घ्या जिवून. दमला असाल, वाईच इसरांती ग्या. दुपारच्यानं मंग वाडा दावतो फिरून. किल्ल्या आनलासा न्हवं?"

यशने मान डोलावली. या शिवाच्या खांद्यावर बसून लहानपणी अनेकदा गावचक्कर मारल्याचं त्याला आठवत होतं. शिवाचंही आता वय झालं होतं. पाठीत वाकला होता चांगलाच. त्याने शिवाची, घरच्यांची विचारपूस केली, तेवढ्यानेच शिवा गहिवरला. उद्या येतो असं सांगून वकील निघून गेला. "मी हाय हितंच भाईर" असं म्हणून या दोघांना दिवाणखान्यात सोडून तो बाहेर गेला. भलामोठा चौरसाकृती दिवाणखाना. दिवाणखान्याची रचना वेगळीच होती. त्यात तीन ठिकाणी वेगवेगळी बैठकीची व्यवस्था होती. एके ठिकाणी सागवानी दिवाण, गाद्या लोड तक्के असा साधारण १०-१५ लोकांना बसता येईल असा जामानिमा, तर एकीकडे चक्क गाद्यागिरद्यांची, भारतीय बैठक. समोर जाजम, जिथे एकाच वेळी २५-३० माणसे बसू शकली असती. एका कोपऱ्यात जिन्याच्या बाजूला एक गोल टेबल, चार कोरीव काम केलेल्या खुर्च्या, अशी कोझी तीनचार जणांसाठीची सोय. 'इथे बसून रोज आपले सासू सासरे दुपारचा चहा पीत असतील का?' जाईच्या मनात विचार आला. जमिनीवर जुना गालिचा पसरलेला होता. त्यातली धूळ मात्र नाकाला जाणवत होती. भिंतींचाही रंग उडाला होता. पूर्वीच्या काळी त्यावर सोनेरी वर्खाचे नक्षीकाम असावे असे वाटत होते.

सगळ्यात लक्ष वेधून घेत होत्या त्या पूर्वजांच्या मोठमोठ्या तसबिरी. अगदी यशच्या खापरपणजोबांपासून सर्वांच्या तसबिरी होत्या. आधीच्या चित्रकाराने काढलेल्या, तर नंतरच्या छायाचित्रांच्या. एका भिंतीवर नवराबायकोच्या तरुणपणीच्या आणि दुसऱ्या भिंतीवर फक्त पुरुषांच्या म्हातारपणीच्या. जाईला मोठंच नवल वाटलं. 'म्हणजे राण्यांनी म्हातारं झाल्यावर फोटोच नाही काढायचे की काय? फक्त तरुणपणीचेच काय फोटो? एका भिंतीवर प्रत्येक कुटुंबाचा फोटो, तो ही राण्या तरुण, आणि मुले तान्ही असतानाचा. गम्मतच आहे मोठी.' तिने शिवाला बोलावून नावं विचारून घेतली फोटोतील व्यक्तींची.

"ह्ये भाऊसाब पयले राजे, मंग ह्ये अप्पासाब, ह्ये दादासाब आन् ह्ये रावसाब तुमचे सासरे, ह्ये धाकले धनी"

असं म्हणून त्याने एका कौटुंबिक फोटोतील लहान मुलाचा फोटो दाखवला. जाईला हसू आलं. मग यश बाहेर गेला अंगणात आणि जाई बसली त्या नक्षीदार खुर्चीवर. अशाच बसत असतील या राण्या. तेवढ्यात जिन्यावर लक्ष गेलं तिचं. एक गोरीपान, मोठाल्या डोळयांची, टोपपदरी लुगडं नेसलेली, नाकात मोरणी, डोळयात काजळ, कपाळावर मोठं कुंकू, पायात पट्टया, एकंदर नखरेल बाई उभी होती. जिन्याच्या कठड्याच्या पट्ट्यांमधून हिच्याकडे एकटक बघत. 'रखमा असावी का ही?' जाई मनात म्हणाली. जाई हसली पाहून तिच्याकडे पण ती नाही हसली. एकटक पहात राहिली. डोळे भावरहीत. तेवढ्यात दार उघडून यश आत आला म्हणून जाई मागे वळली. तेवढ्यात ती गेली. अरे एवढ्यात कुठे गेली? जिना चढण्याचा आवाजही नाही. मग शिवा आला, त्याच्या पाठोपाठ एक बाई आली. लगबगीने किचनकडे जात

"बेगिनी भाकरी पिठलं बनवतु, भुका लागल्या असतील न्हवं?" म्हणाली. अरे म्हणजे ही रखमा, मग ती कोण?

"शिवा, सफाईसाठी कोणी बाई आली आहे का माडीवर"

"नाय बा, आनी, माडीला कुलुपच हाय न्हवं का" जाई, विचारात पडली.

"नाही, नाही, एक बाई गेली ना वर आत्ताच. जिन्यात पाहिली मी तिला. चल बघुया, असेल वरच". शिवा एकदम दचकल्यासारखा झाला.

"अवं नाय वो वैनीसाब, मोटे मालक जाताना कुलुप लावून गेलते. कोन उगडंल? किल्लीच न्हायतर". तिला शिवाचाच संशय आला.

"चल माझ्याबरोबर बघू आपण" असं म्हणून ती तरातरा जिने चढू लागली. शिवा “अवं थांबा अवं थांबा” म्हणेपर्यंत वर पोहोचलीसुद्धा. जिन्यातून वर गेल्यावर उजव्या हाताला एक मोठा दरवाजा होता. त्याला  बाहेरून भला मोठा कडी कोयंडा होता,  भलं मोठं कुलुपही लावलेलं होतं. जाईला सर्वात आश्चर्य तेव्हा वाटलं जेव्हा त्या दारावर, कुलुपावर भरपूर जाळया,



जळमटं, धूळ, साठलेली दिसली. कित्येक महिन्यात तिथे कोणी आलंही नसावं कारण जमिनीवर साठलेल्या धुळीत तिला फक्त स्वत:च्या पायांचे ठसे उमटलेले दिसले. जाई भरभर जिना उतरून खाली आली. तिला शिवा काहीतरी खालच्या आवाजात यशबरोबर बोलताना दिसला. हिला पाहून दोघेही गप्प झाले.

"अरे कुठे गेली ती? वाड्यात बघ असेल इथेच. फार वेळ नाही रे झालेला". जाई जरा वैतागूनच म्हणाली.

शिवाला काय बोलावं कळेना. मग यशने खूण करताच तो जाई आणि यश सोबत वाड्याच्या खालच्या खोल्या, मागचे पुढचे अंगण, सगळे फिरून आला. ती बाई कुठेच नव्हती.

भाग २

परत येऊन दोघे जेवले पण जाईचे मुळीच जेवणात लक्ष नव्हते. तिला राहूनराहून ती बाई गेली कुठे हाच विचार त्रास देत होता. दुपारी पलंगावर पडली, तरी तिची ती एकटक नजर जाईच्या डोळयांसमोरून जाईना. शेवटी जाई उठली आणि परत त्याच खुर्चीत येऊन बसली. तिला आता त्या माडीवरच्या दालनांना पाहण्याची आस लागली. किल्ल्या यशकडे होत्या. शिवा आणि रखमा जिना, दरवाजा साफ करून घेत होते. साफसफाई झाली. रखमाने चहा केला. मग सगळेच वर आले. यशने चाव्या काढून शिवाच्या हातात दिल्या. प्रथम एक चावी शिवाने पूर्ण फिरवून बाहेर काढली. मग दुसरी, नंतर तिसरी. चौथी चावी पूर्ण फिरवल्यानंतर खट्‌कन कुलूप उघडले. शिवाने कडी काढून दरवाजा हळूहळू हलवून मग एका धक्क्यात उघडला. दारातच भरपूर जाळीजळमटं भरली होती. सगळेच थोडे मागे सरकले. रखमाने पदर तोंडाला लावत कापडाने सर्व साफ केले. मग सर्वजण आत शिरले. खालच्या दिवाणखान्याच्या निम्मा एक हॉल होता. मधोमध एक अंडाकृती टेबल आणि बाजूने दहा खुर्च्या होत्या. त्यावरचे कापड शिवाने बाजूला केले. जाई पहातच राहिली. अत्यंत नाजूक अशा कलाकुसरीचे लाकूडकाम केले होते टेबलाला आणि खुर्च्यांनाही. जरा लहान असतं तर सरळ उचलून घरी नेलं असतं असा विचार तिच्या मनी आला. हॉलमधून तीन खोल्यांचे दरवाजे दिसत होते.

यश त्या खोल्यांकडे वळला. पहिली खोली ऑफीसची असावी. लिहिण्याचा डेस्क वगैरे सामान होतं. लहानच होती ही खोली. दुसरी रावसाहेबांची, पर्यायाने वाड्यातील प्रमुख पुरुषाची असावी. भलामोठा पलंग, जाळीदार, सुंदर विणकामाची परंतु जुनी मच्छरदाणी कम पडदा, पलंगावर आच्छादलेला होता. पुर्णाकृती दिसावी असा आरसा होता. तीन भलीमोठी शिसवी कपाटं होती. तिसरी खोली उघडली. जाई आत गेल्यागेल्याच तिला एक अनामिक ओढ जाणवली.

ती आत आली. छोटासा पलंग, तशीच सुंदर पण जुनी मच्छरदाणी, छोटसं ड्रेसींग टेबल आणि त्यावरचा सुंदर वेलबुट्टीने सजवलेला आरसा. आश्चर्यकारकरित्या या खोलीत धूळ मुळातच कमी होती आणि तो आरसा तर नव्यासारखा दिसत होता. अतिशय सुंदर अशा कोरीव कामाने सजवलेला तो आरसा. पाहाताक्षणीच जाई जणू त्याच्या प्रेमातच पडली.

"आपण हा आरसा घेऊन जाऊ". ती पट्कन म्हणाली.

"काहीतरीच काय, आपल्या मॉडर्न घरात, मॉडर्न फर्निचर बरोबर हा किती ऑड दिसेल? आणि ठेवणार तरी कुठे हे एवढं मोठं ड्रेसिंग टेबल?"

"ते बघू, मी काढीन काहीतरी मार्ग, पण हा आरसा आपण न्यायचाच," जाईने हट्ट धरला.

"बघू", एवढेच बोलून यश बाहेर पडला.

शिवा आणि रखमाही त्याच्या पाठोपाठ गेले. जाई तिथेच रेंगाळली. आरशाच्या जवळ जाऊन त्यात स्वत:ला निरखत त्याच्या कोरीव कामावरून हात फिरवत राहिली. बराच वेळ झाला, संध्याकाळ व्हायला आली तरी जाई अजून खाली आलीच नाही म्हटल्यावर यश वर आला, तेव्हा जाई अजून तिथेच आरशासमोर बसलेली दिसली. जवळ गेला तर तिचे लक्ष नाही असे त्याच्या लक्षात आले, म्हणून त्याने खांद्याला हात लावून हलवले तेव्हा कुठे जाई भानावर आली. एखादे सुंदर स्वप्न पहात असावे आणि मधेच कुणी जागे करावे तसे तिचे झाले.

डोळयात एक वेगळीच चमक, ओठांवर हसू, असे तिने यशकडे पाहिले तेव्हा त्याला लग्नापूर्वी प्रथम पाहिलेली आणि मनात घुसलेली जाई आठवली.

“काय मॅडम, कुठे हरवलात, येवढा आवडला हा आरसा की आमचाही विसर पडला?” असे म्हणून हसत हसत त्याने तिला हाताला धरून उठवले. दोघं खाली आली. पण खोलीतून बाहेर पडताना जाईने परत एकदा आरशाकडे नजर टाकली, जणू आरशाला सांगून गेली "आलेच".

खाली आल्यावर तिला रखमा दिसली तशी ती दुपारची बाई आठवली. तिने रखमाला विचारल्यावर ती कावरी बावरी झाली आणि "बापूना इचारा त्येच सांगत्याल" असं म्हणून सटकली. आता मात्र जाई इरेलाच पेटली. तिने शिवाला हाक मारली. शिवा आला तसं तिने त्याला त्या बाईबद्दल विचारलं.

तो चाचरत म्हणाला, "वैनीसाब बेगिनं कामं उरका आन् सुकरूप शहराला जावा झालं."

मग मात्र जाईचा पारा चढलाच. "मी विचारतेय काय तू बोलतोस काय? मला स्पष्ट सांग कोण आहे ती बाई? आणि आपल्या वाड्यात काय करतेय?"

यश पट्कन मधे पडला. म्हणाला "जाऊ दे ना जाई, असेल कोणीतरी. गेलीय ना आता".

"अरे, गेली म्हणजे? कुठे गेली ? हवेत विरघळली म्हणायची का? "

"व्हय वैनिसाब, तसंच म्हनाचं. तुमी शहरातल्या, तुमचा इस्वास नाय बसायचा, पर ह्या वाड्यात पूर्वी बी दिसली ती आन् मग भुर्र न्हायशी जाली. सगळे सांगाचे पर थोरल्या वैनिसाब इस्वास न्हवत्या ठिवत. मंग त्याना दिसली येक दिस, त्या दिसाला जे हातरून धरलं त्ये हुटल्याच न्हाईत. म्हनून म्हनतो बेगिनं जा शहराला, सुकरूप ऱ्हा थितं. हितं काय नाय बगा, समशान जालय निस्तं. आमिबी यायला घाबरतूय. आता तुमी येनार म्हनून सांगावा आला तवा नावीलाज जाला. सफाईसाठीबी कुनी याया बगत न्हाईत".

जाई प्रचंड संतापाने जागेवरून उठली. "मूर्खासारखं बोलू नका काहीतरी. ती बाई मला दिवसा ढवळ्या स्पष्ट दिसली इथे जिन्यात. चेहरा आठवतोय ना मला स्पष्ट".

"पन् घटकेत न्हायशी बी जाली न्हवं? हाय का असं घटकेत न्हायसं व्हायाला जागा? तुमीच बगितलं की वर कसं भक्कम कुलुप व्हतं ते. वैनिसाब, धाकल्या धन्याना आंगाखांद्यावर खेळवलाय म्या. त्याना, तुमाला काय व्हाया नगं म्हनून सांगतूय. ऐका या म्हाताऱ्याचं".

जाईचा अर्थातच अजिबात विश्वास बसला नाही. पण शिवा खोटं बोलतोय असंही वाटेना. मग तिने तात्पुरता तो विषय थांबवला. रात्रीची जेवणे उरकून रखमा आणि शिवा निघून गेले. "रामपाऱ्यालाच येतू जी" असं सांगून गेला. जेमतेम नऊ वाजले असतील, शांतता मात्र मध्यरात्रीसारखी होती. यश लॅपटॉपवर काम करत बसला. जाई, बरोबर आणलेलं पुस्तक काढून वाचण्याचा प्रयत्न करू लागली. शेवटी कंटाळून पुस्तक बंद करून डोळे मिटून पडून राहिली. काही वेळानंतर तिला अचानक बाहेर कसली तरी चाहूल लागली म्हणून ती उठून बाहेर आली. बघते तर तीच बाई, जिन्यात पाठमोरी वर जात होती. जाई ओरडणारच होती, पण मग, तिच्यामागे जाऊन पहावे कुठे जाते, काय करते असं म्हणून हळूहळू तिच्यामागून निघाली.

ती बाई एक एक पायरी चढत वर निघाली, जाई तिच्या मागे. वर गेल्यावर ती सावकाश वरच्या खोल्यांकडे वळली. सरळ आरशाच्या खोलीत जावू लागली, मागोमाग जाई. दरवाजापर्यंत गेली, मग थबकून आत गेली. पाठोपाठ जाई होतीच. ती आरशासमोर जाऊन उभी राहिली. जाई तिच्या मागे अगदी थोड्याच अंतरावर होती. मग ती सावकाश वळली. जाई तिच्या अगदी समोरच उभी होती. तिने हात पुढे केला. काही न बोलता जाईचा हात हाती घेतला आणि आरशाच्या दिशेने चालत निघाली. ती आता आरशावर आदळणार असे वाटत असतानाच तिने आरशात पाऊल टाकले आणि जाईसह ती आरपार गेली.

भाग ३

सकाळी यशला जाग आली तेव्हा जाई शेजारी नव्हती. बाथरूममधे असेल असा विचार करून तो कूस बदलून झोपला. पण मग त्याला परत जाग आली. बाथरूमचं दार उघडंच होतं. त्याने दिवाणखान्यात येऊन पाहिलं, स्वैपाकघरात पाहिलं. जाई कुठेच नव्हती. मग त्याला अचानक वरचा आरसा आठवला. तो धावत वर आला. पाहतो तर, जाई आरशावर मान टेकून, जमिनीवर बसल्याजागी झोपली होती. त्याने घाबरून, तिला जागे करण्यासाठी, हलवायला सुरवात केली तशी हळूहळू तिने डोळे उघडले. अनोळखी चेहऱ्याने तिने यशकडे पाहिले आणि ती सावरून उठून बसली.

"अगं इथे काय करतेस? किती घाबरलो मी. कधीपासून आहेस इथे? आणि अशी काय अवघडून झोपलीस? " जाई काहीच न बोलता हळूहळू उठून खाली आली. पाठोपाठ यश.

"आपण आजच्या आज परत  जातोय". यश निर्णय घेऊन मोकळा झाला.

"चालेल, पण तो आरसा न्यायचा."

"अगं वेड लागलय का तुला? ते एवढं मोठं ड्रेसिंग टेबल ठेवणार कुठे? "

"टेबल नाही नुसता आरसा. भिवा सुताराला बोलवून घ्या. तो देईल सुटं करून. त्याला माहीत आहे सगळं".

काल मॅडमनी शिवाकडून सगळी माहिती आधीच काढून ठेवलेली दिसते. यशच्या मनात विचार आला. शिवा आल्यावर त्याने सुताराला बोलावून घ्यायला सांगितले. तो चंद्रुला घेऊन आला. चंद्रुने टेबल मागून पुढून पाहण्यास सुरवात केली. यश आणि शिवा त्या दोघाना वर

सोडून गाडीची सोय बघायला गेले. मग जाईने त्याला टेबलाचा खालचा ड्रॉवर काढायला सांगितला. तो काढल्यावर बिजागऱ्या दिसल्या आरशाला जोडणाऱ्या. चंद्रूने खिळे काढताच आरसा टेबलापासून सुटा झाला. चंद्रूने सावकाश आरसा मोकळा करून जाईने सांगितल्याप्रमाणे गादीवर ठेवला. "हातासरशी गादी बांधूनच टाक आरशाला" तिने बजावले. गादीसह आरसा शहरी जाण्यास तयार झाला. मोठा टेम्पो आणून, त्यात कागदपत्रं, आरसा आणि इतर काही सामान भरलं. सगळी कुलूपं लावून मंडळी बाहेर आली. यशने सरकारी कागदपत्रांवर सह्या करून झाल्याच होत्या. आता ग्राहक शोधण्याचे काम वकिलावर सोपवून दोघे निघाले. जाईला खरंतर आरशाबरोबर टेम्पोनेच जावेसे वाटत होते पण यश भडकला असता म्हणून टेम्पोच्या ड्रायव्हरला तिने आपल्या पुढे राहण्यास बजावले. यश आपल्या पत्नीकडे पहात होता. म्हटलं तर वेगळं काहीच नाही पण काहीतरी खटकत होतं खास. सामानासह दोघे शहरी आपल्या घरी पोहोचले. यशची कामे त्याची वाटच पहात होती. खरंतर जाईचीही. पण ती आरशासोबत बसून राहिली. यश कामात पूर्ण बुडाला. तिने दुसऱ्याच दिवशी सकाळी फर्निचरवाल्याला बोलावले. त्याच्याशी बोलून आरशासाठी जागा ठरवून टाकली. तिने तिच्या स्टडीच्या दाराला, जिथे तिचा बराचसा वेळ जायचा आणि ती एकटीच तिथे असायची, त्या दाराच्या आतल्या बाजुने आरसा बसवून घेतला. आता तिच्या जीवात जीव आला. कारण आरसा म्हणजे अस्तित्वाचा प्रश्न होता.

तिच्याही आणि जाईच्याही!

यशच्या येण्याची वेळ होत आली होती. ती आरशासमोर उभी राहिली आणि सरळ चालत पलीकडे  दिसेनाशी झाली. जाई अलगद मागच्या खूर्चीत कोसळली. यश आला तेव्हा त्याला ती अशीच दिसली. खुर्चीतच झोपून गेलेली.

यश चिंतेत पडला. त्याने जाईला हलवून जागे करण्याचा प्रयत्न केला, पण ती ग्लानीत होती. अंगात भरपूर ताप भरला होता. मग त्याने तिला पाणी पाजले तेव्हा जरा तिला हुशारी

आली. त्याने तिला बेडरूममधे आणून झोपवले आणि डॉक्टरांना फोन केला. त्यांनी रात्री बघून जातो, ताप जास्त वाढला तर गोळी देण्यास सांगितले. तो तिच्याजवळ बसून राहिला. गोळीने ताप बराच उतरला. हळूहळू जाईला एकेक गोष्ट आठवू लागली. त्या रात्री ती बाई तिच्या हाताला धरून आरशाच्या आरपार घेऊन गेली. नंतर मात्र तिने जाईचा हात झटकून टाकला. ती मागे वळून आरशातून पलिकडे परत गेली. जाई मात्र त्या थंडगार, हिरवट, बुळबुळीत अंधारात, चाचपडत, कितीतरी काळ धडपडत राहिली. ना तिला काही दिसत होते, ना कळत होते. तिला फक्त एकच जाणवत होते ते हे की आपण काही झालं तरी हार मानायची नाहीय. काय वाट्टेल ते झालं तरी. आणि या एका जिद्दीवर ती परत येऊ शकली होती. पण किती दिवस ती तग धरू शकेल हे तिला कळत नव्हतं. तिला एक मात्र नक्की कळलं की हे जे काही सगळं होत होतं, ते फक्त मनाच्या पातळीवर होतं, तिच्या शरीराचा त्यात कुठेच सहभाग नव्हता.

त्या दिवशी वाडा संपूर्ण सजवला होता. नव्यानेच रंगरंगोटी करण्यात आली होती.



भाऊसाहेब खुशीत होते. बऱ्याच वर्षांनी वाड्याला नवी मालकीण मिळणार होती. त्यांच्या मुलाची, अप्पासाहेबाची बायको, म्हणजेच, भाऊसाहेबांची सून वयात आली होती. व्याह्यांचा तसा निरोप आला होता. आज सूनबाई कायमच्या वाड्यावर राहायला येणार होत्या. एका मोठ्या जबाबदारीतून मोकळं झाल्याची भावना त्यांच्या मनात होती. मंडळी पोचली. रितीरिवाज, परिवारातील इतर स्त्रियांनी पूर्ण केले. भाऊसाहेबांच्या पत्नीचे

अकाली निधन त्यांना फार एकटे करून गेले होते. पण मुलाला सावत्रपणा नको म्हणून त्यांनी दुसऱ्या लग्नाचा विचारही मनात आणला नव्हता. रितीप्रमाणे गावातील कलावंतीण, सूनेची दृष्ट काढायला आली होती. तिच्याबरोबर तिची उफाड्याची मुलगी शेवंताही आली होती. खाली कार्यक्रम सुरू झाले. पुरूषमंडळींची व्यवस्था वरच्या खोल्यांमधे केली होती. खाली बायकांचे कार्यक्रम सुरू होते. अप्पासाहेब आपल्या खोलीत बसला होता. आज त्याची पत्नी त्यास तशी प्रथमच भेटणार होती. इतक्यात शेवंता त्याच्या खोलीत आली आणि तिने दार लावून घेतले. ती सरळ अप्पासाहेबाच्या समोर येऊन उभी राहिली आणि तिने वस्त्रं उतरवण्यास सुरूवात केली.

तो प्रचंड हबकला. "अगं काय करतेस हे?" असं जवळपास ओरडलाच.

शेवंताही संतापूनच आली होती. "का कालपर्यंत हेच गोड वाटत होतं ना. मला कायमचं आपलं करण्याचं आमिष दाखवून आता सवत आणून बसवता होय माझ्या छातीवर?"

"काहीतरी बडबडू नकोस. आजपर्यंत तुला काही कमी पडलं नाही, पुढेही पडणार नाही. कलावंतीण आहेस हे विसरू नकोस." असं म्हणून तो तरातरा खोलीच्या बाहेर जावू लागला.

तशी शेवंता इरेला पेटली. "अश्शी अर्ध्या कपड्यात बाहेर येऊन तमाशा करीन" तिने धमकावले.

अप्पासाहेबाने तिला झिडकारले आणि तरातरा बाहेर निघून गेला. भाऊसाहेब शेजारच्या खोलीतून सर्व ऐकत होते. ते आतील दरवाजा उघडून आत आले. त्यांनी रागाने बेफाम बाहेर जाणाऱ्या अर्धवस्त्रा शेवंतास, हाताला धरून आत खेचले. नकळत घडलेल्या या प्रकाराने ती धडपडली आणि दोघं खाली पडली. भाऊसाहेबांना पाहून प्रथम भीती, मग राग, अशा अनेक भावनांनी ती बेफाम झाली. ओरडण्यास तिने आ वासला पण त्याचक्षणी भाऊसाहेबानी तिचाच पदर तिच्या तोंडी कोंबला. अनेक वर्षांनंतर झालेला स्त्रीचा हा असा स्पर्श त्यांना बेभान करून

गेला आणि त्यांच्या हातून नको ते घडले. शेवंता हातपाय झाडत राहिली पण तिचा विरोध दुबळा होत गेला.

भाऊसाहेब भानावर आले तेव्हा ती निपचित पडली होती. डोळे सताड उघडे. त्यांनी तिला हलवले पण तोंडात कोंबलेल्या पदराने  गुदमरून तिचा केव्हाच मृत्यू झाला होता. भाऊसाहेबांना दरदरून घाम फुटला. काहीतरी लगेच करणे निकडीचे होते. पण काय हे त्यांच्या घाबरलेल्या बुद्धीस समजेना. ते धडपडत उठले. प्रथम दरवाजा बंद केला. शेवंताचे शव हळूहळू ओढत आरशाच्या कपाटापर्यंत आणले आणि कपाटात कसेबसे कोंबले. मग घाईघाईने खोली पूर्ववत केली. स्वत:चे कपडे ठीकठाक केले आणि परत एक नजर खोलीभर फिरवली. त्यांची नजर सजवलेल्या पलंगाकडे गेली. प्रचंड अपराधी भावनेने त्यांना घेरले. पण विचार करत बसायला वेळच नव्हता. त्यांनी कपाटास कुलूप लावले. मग खोलीस कुलूप लावले. सावकाश सर्व बसले होते तेथे आले. खालचा कार्यक्रम संपतच आला होता. जेवणाचे बोलावणे आले. सर्व खाली आले. कलावंतीणीस तिचा मोबदला दिला तशी ती परत निघाली. शेवंता कुठे दिसेना. ती तिला शोधू लागली. ‘कुठे गेली?’ पण थोरामोठ्यांच्या गडबडीत विचारायचं तरी कोणाला? भिवा सुतार दिसला, त्याला म्हणाली ‘दिसली तर दे लावून घराकडे.’ तो ‘बरं’ म्हणाला. इकडे नव्या नवरीला सजवून तयार केली गेली. सगळे गेल्यावर तिला दुधाचा पेला घेऊन वरच्या, अप्पासाहेबाच्या खोलीत पाठवण्यात आले. अप्पासाहेब स्त्रीसुखास नवखा नसला तरी नव्या नवलाईने नव्या वधुकडे आकर्षिला गेला. दोघांची पहिली रात्र रंगत गेली आणि आरशापलीकडे शेवंताच्या निर्जीव डोळयांमधून आग बरसू लागली. संताप, मत्सर, द्वेष, सूडभावना या सर्व जाळणाऱ्या दाहक भावना तिच्या डोळयातून आग ओकत होत्या. त्याच विषारी नजरेने शेवंताने आरशातून वळून जाईकडे पाहिले. इतका वेळ सिनेमाप्रमाणे आरशात भान हरपून सर्व घटना पाहणारी जाई दचकून भानावर आली. एकाच वेळी सर्पासारखी थंड संवेदना तिच्या शरीरभर फिरली आणि तिला दरदरून घाम फुटला. वाड्यातल्या जिन्यातली भावनारहीत नजर, तिला आरशापलीकडे

नेतानाची निर्विकार खुनशी नजर आणि आत्ताची ही भयानक जाळणारी विखारी नजर! भयंकर होतं हे सगळंच. तिची नजरही आणि पाहिलेली घटनाही. काही कळायच्या आत जाई स्टडीमधून हेलपाटत बाहेर आली आणि बेडरूममधे पलंगाच्या कोपऱ्यात अंगाचं मुळकुटं करून थरथरत बसून राहिली. स्वप्न आणि सत्याच्या सीमारेषेवर ती हेलकावत होती. काय होतंय हे कळण्याच्या पलीकडे ती गेली होती. डोकं सून्न झालं होतं. बराच वेळ असं बसून राहिल्यावर जाई हळूहळू उठली. किचन मधे जाऊन गटागटा पाणी प्यायली. शरीर चिपाडासारखं वाटलं तिला, जीवनरस कुणीतरी पिळून घेतल्यासारखं. सकाळी यश बाहेर पडल्याबरोबर ती स्टडी मधे गेली होती. दार पुढे करून खुर्चीत बसावं म्हणून दाराला, पर्यायाने आरशाला हात लागला आणि बटन दाबून टीव्ही चा पडदा ऑन व्हावा तसा चित्रपटच सुरू झाला. आता यश यायची वेळ झाली होती पण जाईच्या पोटात अन्नाचा कणही सकाळपासून गेला नव्हता. जे घडत होतं ते एकाच वेळी प्रचंड ओढीने आपल्याकडे खेचणारं पण त्याचवेळी जाईला स्वत:च्या अस्तित्वाच्याच सुरक्षिततेची भिती वाटावी असं होतं.

बघता बघता जाईला हुडहुडी भरली आणि ताप आला. ती बेडरूममधे जाऊन निजून राहिली. यश आल्यावर मात्र त्याने ताबडतोब डॉक्टरांना फोन केला. त्यांनी डोक्यावर पट्ट्या ठेवायला सांगितल्या. गोळीही घेण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी तिच्या सर्व चाचण्या करण्यात आल्या. वैद्यकिय चाचण्यांमधून काहीही रोग नाही हे सिद्ध होत होते. साधा व्हायरल फिवर आहे, होईल कमी असा दिलासा डॉक्टरांनी दिला.

भाग ४

दुसऱ्या दिवशी यशच्या महत्वाच्या मिटींग्ज होत्या. जाईने त्याला आग्रहाने जायला लावले. मी बेडवरून उठणारच नाही असा निर्वाळाही दिला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच नवरानवरीस देवदर्शनास नेले. साताठ तासांचा प्रवास होता. मंडळी मुक्काम करून तिसऱ्या दिवशी परतणार होती. भाऊसाहेबांनी प्रकृती अस्वास्थ्याचे निमित्त पुढे केले. सगळयांना धाडले. त्यात घरात राबणारे, नुकतेच लग्न झालेले, शिवाचे आजा-आजीही होते. तुम्हाला तरी देवदर्शन कधी होणार, असे म्हणत आग्रहाने धाडले. मालकाच्या दानतेने ती दोघे सुखावली. सगळे गेल्यावर भाऊसाहेबांनी शेवंताचे शव ओढत नेत वाड्याच्या छतावरून मागच्या दरीत फेकून दिले. आरशाच्या कपाटाच्या बिजागऱ्या तोडल्या, मग भिवास बोलावून नवे कपाट बनवून त्यावर या आरशाचे दार लावण्यास सांगितले. जुने कपाटाचे लाकूड सरपणात वापर असेही सांगितले. भिवा डोक्यावरून कपाट घेऊन आला. त्याने कपाट मोकळे केले. नवे कपाट बनवण्यास घेतले.

काम करताना त्याची नजर वर गेली तर त्याला शेवंता दिसली.

तो ओरडलाच तिच्यावर "अगं शेवंते कुटं व्हतीस काल तू? तुजी आय किती सोदायली तुला? कवा गेलिस मंग घरला? जा आता सरळ घरी." असं म्हणून त्याने परत कामाला सुरवात केली.

भिवाला रोज छटाक चढवूनच काम करायची सवय, त्यामुळे त्याने नंतर ती कुठे गेली, वगैरे पाठपुरावा केला नाही. शेवंता अजूनही बेपत्ताच आहे आणि कलावंतीण अजून शेवंताला शोधतेय असं कळल्यावर तो ओरडलाच. "काय यड्या का खुळ्या गं मायलेकी तुमी? आगं कालच न्हवं काय माज्या झोपडीवरून गेली. रागं बी भरलो म्या तिला न् सरळ घरला जाया सांगितलं".

मग शेवंताचा शोध सुरू राहिला. पण संशयाची सुई, वाड्याच्या दिशेने फिरली नाही, कारण भिवाला ती वाड्यावरच्या कार्यक्रमानंतर दिसली होती.

चित्रपट पहावा तसे चलचित्र जाई आरशात पाहत होती. तुकड्यातुकड्यातून रोज नवे काही कळत होते. तिची सर्व शक्ती यांत कामी येत होती. ना धड जेवत होती, ना झोपत होती. ताप कमी होता, पण डोळे खोल गेले होते. वजन घटत चालले होते. मग यश परत तिला डॉक्टरांकडे घेऊन गेला. पुन्हा सर्व तपासण्या झाल्या. यशला जरा बाजूला घेऊन, त्यांनी मानसोपचारतज्ञांकडे जायला सांगितले. नंतर जाईला म्हणाले "तू सुशिक्षित आहेस, जेव्हा शरीर निरोगी असूनही रोग बरा होत नाही, तेव्हा मनाची तपासणी करणे योग्य. मी तुला माझ्याच एका चांगल्या मित्राकडे पाठवतोय. तो नक्की बरी करेल तुला." जाई फिकट हसली. यशच्या समाधानासाठी तिने जायचे ठरवले. जाईच्या काळजीने, यशचे लक्ष सगळयातूनच उडाले होते.

शेवंताने, सुरवातीला तिचे मन जरी संपूर्ण आपल्या ताब्यात घेतले तरी, लवकरच जाई तिच्या कह्यातून बाहेर आली होती. ती स्वत:च्या मनाचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होती. पण हे करताना तिची सर्व शक्ती कामी येत होती.

यशने ठरल्याप्रमाणे मानसिक रोगतज्ञांची भेट ठरवली. दोघे त्यांना भेटून आले. जाईने आरसा प्रकरणाचा मागमूसही लागू दिला नाही. ताप आल्या दिवसानंतर यशला जाई परत कधीच फारशी आरशाजवळ दिसली नव्हती. त्यामुळे त्यालाही ती बाब महत्त्वाची वाटली नाही.

मग डॉक्टरांनी काही अजून प्रश्न विचारून काही गोळया लिहून दिल्या. मनातून ते ही बुचकळयात पडले. जाईच्या बोलण्यावागण्यात एवढी सुसुत्रता होती की, निदान हेच होते की, काहीच रोग नाही. मग जरा शांत झोप लागण्याच्या, सौम्य गोळया देऊन, त्यांनी त्या दोघांची पाठवणी केली. केवळ जाईच जाणून होती की शेवंताला तिच्या मनावर हावी न होवू देण्यासाठी, किती निकराने तिला लढावे लागणार होते. पण यशला विनाकारण काळजीत टाकण्यात अर्थ नव्हता. शिवाय त्याचा विश्वास बसणं त्याहून शक्य नव्हतं. काही दिवसांपूर्वी आपल्याला कोणी काही असं सांगितलं असतं, तर आपण किती वेड्यात काढलं असतं, या विचाराने जाई अस्वस्थ झाली. आता तिला अतिशय विचारपूर्वक पावलं उचलावी लागणार होती. दोघे घरी आले. यश, डॉक्टरकडूनच जाईला बरं वाटेल म्हणून, तिच्या आवडीच्या उपहारगृहात घेऊन गेला. तिच्या आवडीचे सर्व पदार्थ मागवले. इकडच्या तिकडच्या, गमतीच्या, गोष्टी सांगून तिचे मन रमवण्याचा प्रयत्न करू लागला. जाईचे मन भरून आले. यशच्या कुशीत शिरून, सर्व त्याला सांगून टाकावे, असा मोह तिला झाला. पण विचारपूर्वक तिने स्वत:ला सावरले. तिने आपण सर्व गोष्टींचा आनंद घेतोय हे यशला जाणवावे म्हणून खास प्रयत्न केले. त्याचा योग्य तो परिणाम झाला.

घरी आल्यावर यश म्हणाला "मी जरा कामं संपवू का? तुला बरं वाटतय ना? नाहीतर बसतो तुझ्याजवळ".

"नाही नाही. तू निर्धास्त कर काम. मी डॉक्टरांची गोळी घेते आणि झोपून टाकते. आज मला खूपच बरं वाटतय". ती यशकडे पाहून हसली, तसा तो खूपच मोकळा झाल्यासारखा वाटला.

मग मात्र तो घरातच बनवलेल्या, छोट्याशा, ऑफिसमधे जाऊन बसला. जाईने डॉक्टरांनी दिलेली गोळी हातात घेतली आणि बेसिनमधे टाकून दिली. पाणी मात्र प्याली. लॅपटॉप उघडून तिने "मृतात्मे" या विषयावरील माहिती वाचायला सुरुवात केली.

भाग ५

जाई एकदा एखाद्या विषयाच्या अभ्यासाला लागली की, इतकी एकाग्र होत असे की मग बाकी कोणतीच गोष्ट तिचे चित्त विचलित करू शकत नसे. तिने याच गोष्टीचा, शेवंताला आपल्या मनापासून दूर ठेवण्यासाठी वापर करण्याचे ठरवले. थोड्या वेळाने तिने मन एकाग्र करण्याच्या अनेक पद्धतींपैकी एकीचा वापर करत, डोळे मिटून स्वस्थ पडून मन एकाग्रतेच्या सरावास सुरवात केली.

काही वेळाने तिचा मनातल्या मनात प्लॅनही ठरला. या सर्व गोष्टींच्या असं आहारी जाऊन चालणार नव्हतं. आत्ता प्राथमिकता ही होती की लढायचं असेल तर शरीर, मन दोन्ही निरोगी आणि सुदृढ हवं. त्यासाठी व्यवस्थित दिनक्रम आखून घ्यावा लागणार होता.

मंडळी देवदर्शनाहून परतली. नवी नवरानवरी आनंदात दिसत होती. भाऊसाहेब मात्र एकदम थकल्यासारखे दिसू लागले. सतत पडून राहू लागले. धड जेवेनात. झोप तर पार उडालीच होती. एक दिवस अप्पासाहेब म्हणाला "चला तुम्हाला छतावर घेऊन जातो, मोकळया हवेत बरं वाटेल." भाऊसाहेब एकदम दचकले, नको नको म्हणू लागले. मग त्यानेही नाद सोडला.

भिवाने नवे कपाट, वर आरसा,खाली ड्रॉवर, असे आधुनिक रचनेचे बनवून आणले. नव्या नवरीला ते फार आवडले. तिने ते स्वत:च्या खोलीत ठेवून घेतले. काही दिवसांनी नव्याची नवलाई सरली आणि अप्पासाहेबाने नेहमीच्या बग्गीवाल्यास बोलावणे पाठवले. तिजोरीतून एक भारी भक्कम सोन्याचा दागिना उचलला. बग्गीवाला आला, पण शेवंताकडे जायचे म्हंटल्यावर वेड्यागत पाहत राहिला तोंडाकडे. मग त्याने शेवंता नाहीशी झाल्याचा सर्व वृतांत सांगितला.

अप्पासाहेब जरा दचकल्यागत झाला पण त्याने बग्गी कलावंतिणीच्या कोठीवर नेण्यास सांगितले. याला पाहून ती बिचारी रडू लागली. दागिना तिच्या हातात देवून त्याने तिच्याच पाठीवर हात ठेवला. ती प्रथम दचकली मग त्याला घेवून आतल्या खोलीत गेली. तिच्या कोठीतील कंदील मंद झाले. बग्गीवाला एक सणसणीत शिवी घालत पचकन थुंकला.

जाईलाही पोटात डचमळून आले. आपल्याला नक्की उलटी होणार असे वाटून ती बाथरूम मधे आली. मनुष्यप्राण्यात, शेवटी 'प्राणी' शब्द येतो तो उगाच नाही असे तिला वाटले. कदाचित प्राण्यांना कळत असते तर त्यांना ही शिवीच वाटली असती असेही वाटले.

भाऊसाहेब दिवसेंदिवस खंगत चालले. कधीकधी भ्रमिष्टासारखे असंबद्ध बोलत, हातवारे करत. त्यांच्या हातून घडलेल्या अक्षम्य अपराधाचे सावट त्यांना जगूही देत नव्हते आणि मृत्यूही कृपा करत नव्हता. अप्पासाहेबाने मांत्रिकास बोलावले. त्याने सांगितले ते सर्व उपाय करून झाले. एक दिवस भाऊसाहेब तरातरा उठले. छतावर गेले आणि मागून येणाऱ्या शिवाच्या आजोबांना काही कळण्यापूर्वीच त्यांनी दरीत उडी घेतली.



जाईचा हातही क्षणभर पुढे झाला, अभावितपणे, त्यांना थांबवण्यासाठी. तेवढ्यात तिला शेवंता दिसली आरशात, खुनशी डोळयांनी पहात होती भाऊसाहेबांनी उडी मारलेल्या दिशेने.

भाऊसाहेबांचे शव काढण्यास माणसे दरीत उतरली तेव्हा त्यांना दोन शवे मिळाली. एक भाऊसाहेबांचे आणि दुसरे कुजलेले, गिधाडांनी टोची मारूनमारून अस्थीपंजर केलेले, ओळखूही येवू नये असे, शेवंताचे शव. पण हातातल्या हाडांवरची काकणं आणि पायातल्या पट्ट्यांनी ओळख पटली. कलावंतिणीने केलेला आक्रोश ऐकून जाई ढसाढसा रडली. पुढचे काही दिवस तिला, घरातच कोणाचा तरी मृत्यू  झाल्यावर पडावे तसे सावट मनावर पडल्यासारखे वाटत राहिले.

तिला वाचनातून नवे नवे संदर्भ मिळत होते. मृतात्म्यांचं एक वेगळं जग, आपल्या या सर्वसाधारण जगातच सामावलेलं आहे याची जाणीव तिला व्हायला लागली. मांजरीला रात्रीच्या अंधारात दिसतं म्हणे पण आपले डोळे अंधारात पाहू शकत नाहीत. पण अंधार पडला म्हणून आसपासचं जग नाहीसं नाही ना होत, तसंच या जगाचं आहे. आपल्यात आणि त्यांच्यात कम्युनिकेशनचा मार्ग नाही, म्हणून हे जग आपल्याला कळत नाही. म्हणजे ते नाहीच असं कसं म्हणता येईल. असे उलटसुलट मतप्रवाह तिच्याच मनात सुरू असत.

तिचा दिवस पूर्वीपेक्षा कित्येक पटींनी व्यस्त झाला होता. सकाळ पूर्णपणे यशची असे. तो गेला की मन:शक्ती वाढवण्याचे, एकाग्रता वाढवण्याचे, सराव ती करे. मग स्टडीमधील काळ. ज्यात नवनवे संदर्भ समोर येत. त्यानंतरचा वेळ त्या दिवशी समजलेल्या नव्या माहितीची टिपणे. मग वाचन. महत्वाचे संदर्भ साठवून ठेवणे वगैरे. यश यायच्या काही काळ आधी ती ध्यानास बसे. त्यामुळे दिवसभराचा मानसिक ताण नाहीसा करण्यात काही अंशी का होईना तिला यश मिळे. त्यानंतर जेवणे होईपर्यंत ती यशबरोबर ऑफिस मधील गोष्टी बोले. मग त्याचे काम असे, ते तो संपवी.  जाईला विश्रांती घेण्यास सांगे. त्याला ती अजूनही अशक्तच दिसत होती.

उच्च शिक्षण पुरे करत असताना वापरलेले अभ्यासाचे सर्व नुस्खे ती इथे वापरत होती. वाचन, मनन, चिंतन, स्वाध्याय, सर्व शिस्तबद्ध पद्धतीने सुरू होतं. फरक एवढाच होता की तेव्हा,

एक साधी परीक्षा होती, जिथे विचारले जाणारे प्रश्न, बऱ्यापैकी माहीत होते. परीक्षेमधे मिळणारे गुण, एवढीच जोखीम होती. इथे मात्र परीक्षा कधी होणार, कशी होणार, काहीही माहीत नव्हतं आणि जोखीम होती तिच्या संपूर्ण अस्तित्वाची.

भाऊसाहेबांच्या मृत्यूनंतर, शेवंताचा मृतदेह मिळाल्यानंतर, अप्पासाहेबाच्या वागणुकीत बराच फरक पडला. एक तर, उत्पन्नाची सर्व जबाबदारी अंगावर पडल्यामुळे बराच वेळ त्यातच जाऊ लागला. त्यातून पत्नीस दिवस गेले. तो जबाबदारीने वागू लागला. कलावंतीणही गांव सोडून गेली.

एक दिवस त्याची पत्नी आपल्याच खोलीत आरशासमोर अचानक बेशुद्ध पडलेली आढळली. वैद्यांना बोलावणे केले. त्यांनी काही चाटणे दिली. काही दिवस संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला. ती शुद्धीवर आली पण तिच्या वागण्याबोलण्यात फरक पडला. ती अचानक भडक लुगडी नेसू लागली. डोळयात भरपूर काजळ घालू लागली. हावभाव, हसणं, बोलणं, सगळयातच एक प्रकारचा भडकपणा जाणवू लागला. अप्पासाहेब बिथरलाच हे पाहून. बरंच सांगून पाहिलं, पण काही उपयोग होईना. एक दिवस संतापाने भडकून त्याने तिच्यावर हात टाकला. तेव्हा डोळे रागारागाने गरागरा फिरवत,

"पूर्वी मी केलेलं चालत होतं, आता बायको करते तर पटत नाही काय ?"

असा सवाल पत्नीच्या मनावर पूर्ण ताबा मिळवलेल्या शेवंताने केला आणि वीजेचा धक्का बसावा तसा तो मागे हटला.

बायकोच्या माहेरी कुणकुण लागलीच होती. आईवडिल बाळंतपणासाठी म्हणून जरा आधीच घेऊन गेले. तिकडे गेल्यावर तिचे भडक वागणे कमी झाले पण मन अधूच राहिले. आठव्या महिन्यातच, मुलाला जन्म देताना, तिचा मृत्यू झाला. आप्पासाहेबांनी दुसरा विवाह केला नाही.

तो तंत्रमंत्राच्या सहाय्याने आपली भीती जोपासत जगत राहिला. दादासाहेब आजोळीच राहिला. तिथेच विसावं लागतंय तोच आजाने लग्नही लावून दिले. पोर मोठी चुणचुणीत होती. अवघी पंधरा वर्षांची, पण कामाचा उरक असा, की भल्या भल्यांनी पहात रहावं. आजा-आजी नातसूनेवर खुश होते. दादासाहेबासही, कामकाजाची उपजत जाण होती. परंतु मामाच्या मुलाला दादासाहेबाने त्याच्या उत्पन्नात वाटेकरी होणं आवडेना.

एक दिवस बोललाच "तुझ्या वडिलांची एवढी मोठी मालमत्ता आहे, ती जाऊन सांभाळत का नाहीस?"

दादासाहेब बायकोस घेऊन वाड्यावर पोहोचला.

भाग ६

एव्हाना शेवंताची दहशत सर्वांनाच बसली होती. कधीकधी कुणाकुणाला ती दिसायची. तिच्यासाठी वाड्यावर आणि गावातही, प्रत्येक शुभकार्यापूर्वी, पौर्णिमा, अमावास्येला, ओटी काढून ठेवण्याची प्रथा पडली होती.

आज बेडवर पडल्यापडल्याच चलचित्र सुरू होते. स्टडीमधे जाण्याचीही गरज उरली नाही.

जाई विचार करू लागली, शेवंता थोडी शांत झाली असावी. माणसाचा जसा "मी" सुखावतो तसाच तिचाही "मी" सुखावला असेल का, या नव्या मिळणाऱ्या मानामुळे? अचानक तिला तिच्या आजीची आठवण झाली. तिचं बोलणं, जे तेव्हा काही म्हणजे काही कळलं नव्हतं ते आज आठवलंही आणि समजलंही.

केव्हातरी, श्राद्धविधी पाहताना जाईने विचारले “आपण हे असे जेवण पणजोबा पणजींसाठी ठेवतो, पण त्यांना हे आवडतं का? दर वर्षी तेच ते?”

तेव्हा आजी म्हणाली होती "बरोबर गं बाई माझी. अशा थातूरमातूर कर्मकांडानी पितरं उद्धरती, तर अजून काय हवं होतं. पण त्यांना विचारतो कोण? आपल्याच मनीचे करत बसतात. तो भट सांगणार आणि हे शहाणे ऐकणार झालं."

मग सायंकाळी केव्हातरी आजी डॅडला बोलावे, चिनी मातीच्या फुटक्या कपात त्यांना थोडी व्हिस्की (तिच्या भाषेत “तुझी ती विलायती ओत रे घोटभर”) द्यायला लावे, थोडी भजी

तळे, गोडाचं काहीतरी बनवे, मग सर्व काही घेऊन मागीलदारी ओढ्याजवळ एक मोडकळीला आलेली भिंत होती त्यावर ठेवून येई.

"कधीमधी इतर वेळीही यांचे असे काही चालू असते" असं काकू आईला सांगत राही हळू आवाजात.

आजीला कसं कळत असेल मृतात्म्यांना काय हवय? तिचं कम्युनिकेशन होत असावं का? मिडीयम, म्हणजे माध्यम, होती का ती? प्रश्न, प्रश्न, प्रश्न!

मग तिने माध्यमे, म्हणजे त्या व्यक्ती, ज्यांना मृतात्म्यांशी या ना त्या पद्धतीने संवाद साधता येतो किंवा मृतात्म्यांना त्यांच्याशी संवाद साधता येतो, अशा व्यक्तींविषयी अधिक माहिती काढण्यास सुरवात केली. वाचताना तिच्या लक्षात आले, या माहितीप्रमाणे तर, आपणही माध्यम आहोत एक प्रकारे. शेवंता आपल्याशी बोलत नसली, तरी दिसते आहे, दृक् माध्यमातून, आपल्यापर्यंत पोहोचते आहे. नंतर तिला एक मृतात्म्यांच्या मानसिकतेवरचा मोठा लेख मिळाला. पाश्चात्य माणसाने लिहीला होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, मृतात्मे काही वेळेस प्रचंड खोटंही बोलू शकतात. यांच्याशी डील करायला माणूस एकाच वेळी संवेदनशील, पण तितकाच बुद्धीमान असायला हवा. जितकी माहिती मिळत होती, ती अधिकाधिक बुचकळयात टाकणारी होती. जाईला जाणवले की अंती तिला तिच्या स्वत:च्याच जोरावर आयत्यावेळी सुचणाऱ्या शहाणपणानेच मार्ग काढावा लागणार होता.

दादासाहेब पत्नीस घेऊन वाड्यावर आला. शिवाच्या आईवडिलांनी आता वाड्याची चाकरी घेतली होती. अप्पासाहेबाच्या मनास एकाच वेळी आनंद आणि भीती या दोन्ही भावनांनी घेरले. तरण्याबांड मुलात त्याला आधार दिसला, पण मांत्रिकाने सांगितलेलेही आठवले, 'या

घरात सवाष्ण फार जगायची नाही'. त्या कोवळया पोरीस पाहून त्याचे मन भरून आले. अपराधी भावनेनेही अलीकडे कधी नव्हे ते त्यास घेरायला सुरूवात केली होती.

रात्री दादासाहेब आणि पत्नी खोलीत आले. दादासाहेबाच्या तरण्याबांड शरीराकडे शेवंता आरशातून आसुसून पाहू लागली. त्याच्याबरोबर त्याची पत्नी पाहून ती पुन्हा एकदा बिथरली.

तिची ती विखारी नजर पाहून जाईचा जीवही घाबरला.

नव्या सुनेने आल्याबरोबर नव्या घराचा भार आपल्या शिरी घेतला. बारीकसारीक गोष्टींचीही माहिती घेवू लागली. एका अमावास्येला शिवाची आई ओटी काढून घेऊन निघाली. लोकांनी कलावंतिणीच्या घरासमोरच शेवंताची मठी बांधली होती. तिथेच ओटी ठेवण्याची प्रथा रूढ झाली होती.

सुनेने विचारले "कोणती देवी?"

त्यावर शिवाच्या आईने तिला कर्णोपकर्णी कळलेली कथा सांगितली, अर्थातच त्यात अनेक काल्पनिक गोष्टी मिसळल्या होत्याच.

त्यावर नवी सून म्हणाली, "एका परमेश्वरावर विश्वास ठेवावा. तो ही काही मागत नाही. कृतज्ञता म्हणून कधी काही वहावे त्याला. पण अशा दु:शक्तींना थारा देऊ नये. चला आणा ती ओटी, तुम्ही काढलीच आहे तर गावातील भवानीदेवीस वाहून येऊ. माझे वडील म्हणतात, बरे वाईट घडणे प्राक्तनाचा खेळ, व्हायचे ते होतेच, पण अशा शक्तींचा मोठेपणा वाढवू नये. माणूस हळूहळू मन:शक्तीच हरवून बसेल अशाने."

शिवाची आई पाहतच राहिली. ती काय बोलली, फारसे कळले नाही तिला, पण एकदम आधार वाटला तिला या एवढ्याशा पोरीचा आणि तिच्याविषयी काळजीही. यानंतरचा

शेवंताचा थयथयाट घाबरवून टाकणारा होता. केस पिंजारलेले, डोळे आधीच मोठे, त्यातून ते वटारलेले, चेहरा म्हणजे मूर्तिमंत कैदाशीण वाटावी.

जाईच्या मनाचा पाहूनच थरकाप उडाला. तिने पट्कन डोळे मिटले आणि तंद्री भंग पावली. आपल्या आक्रसलेल्या शिरा तिला जाणवल्या. पाहायला गेले तर सिनेमाच होता तो तिच्यासाठी. पण मानसिक आणि  शारिरीक पातळीवर किती खोलवर परिणाम होतोय हे पाहून ती थिजली. हे असे किती दिवस सुरू रहाणार? कसे संपणार? की नाहीच संपणार? आपलाही बळी जायचेच ठरले आहे का? सरसरून काटा आला तिच्या अंगावर या विचारांसरशी. भीतीचे सावट मनावर पडण्यापूर्वीच तिने तो विचार झटकला. ती उठली आणि नेहमीप्रमाणे मन एकाग्र करत ध्यानाला बसली. यश आला तेव्हा त्याला ती ध्यानाला बसलेली दिसली. एकदमच वेगळी भासली त्याला जाई आज. ‘किती बदललीय ही. पूर्वी आपण आल्यावर चिवचिवत असायची नुसती. मग वीकएन्डचे प्लॅन बनवून ठेवायची, आणि आपण कामाची अडचण सांगितली की, ‘चल आजच संपवून टाकू’ म्हणत आपल्याला सगळी मदत करत खरंच संपवत आणायची. हक्काने मग ठरवलेला प्लॅन पूर्ण करायची. शिवपुरीला जाण्याचा प्लॅनही, असाच हट्टाने पूर्ण करून घेतला तिने. पण हरवली आपली जाई तिथेच कुठेतरी. शिवा सांगत होता ते खरं असेल का? मला तेव्हा तरी त्यात काही तथ्य वाटलं नाही. तरी मी कामं उरकून लगेच परत आणलं जाईला. मला विषाची परीक्षा नव्हतीच पहायची. पण आता जे काही जाईला होतंय, त्यात शिवा म्हणत होता तसं काही असेल? जाईशी बोलावं का? नकोच. आधीच ती स्वत:च्या कोषात असते. आता ती आपण समोर असलो की उत्साहाने बोलण्याचा प्रयत्न करते पण तो उसना उत्साह लगेच कळतो. काय होतंय हिला? आपलं लक्ष कमी पडतय का?’ यश तिची तंद्री भंग न पावेल अशा बेताने आपल्या घरातल्या ऑफिसमधे येऊन बसला.

भाग ७

शेवंता सावकाश स्टडीतून बाहेर आली. ऑफिसच्या दिशेने जाऊ लागली. तिच्या पायातल्या पट्ट्यांचे आवाज छूम छूम छूम..., जाई एकदम सावध झाली. बाहेर आली, तर शेवंता तिला ऑफिसच्या दारातून आत जाताना दिसली. धास्तावलेल्या मनाने जाई ऑफिसच्या दाराशी पोचली. यश आत होता. त्याने अंगातला शर्ट उतरवला होता. दरवाजाकडे त्याची पाठ होती. शेवंता त्याच्या अगदी जवळ उभी होती. नुसती. जराही हलली असती तरी त्याला स्पर्श झाला असता. आसुसलेल्या नजरेने ती त्याला पहात होती. जाई ओरडणारच होती, तेवढ्यात यश मागे वळला, "झालं तुझं मेडिटेशन? छान तंद्री लागली होती तुझी."

जाईची क्षणभर नजर यशकडे वळली आणि तेवढ्यात शेवंता दिसेनाशी झाली. पण जाईला मात्र अंतर्बाह्य हादरवून गेली. तिचा पांढरा फटक पडलेला चेहरा पाहून यश झट्कन तिच्या जवळ आला.

"अगं काय होतय तुला? अशी काय बघते आहेस?” त्याने तिला हाताला धरून आत आणले. खुर्चीत बसवले.

“काय होतय जाई तुला? पूर्वीसारखी हसत नाहीस, बोलत नाहीस, सतत कसल्यातरी विचारात, काळजीत असल्या सारखी वाटतेस. आज तुझ्या डॅडचाही मला युएसहून फोन आला होता. तू खूप दिवसात बोललीच नाहीस म्हणाले. काळजी वाटतेय त्यांनाही तुझी. मी त्यांना तुला मध्यंतरी ताप आला होता, ते सांगितलं, आता बरी आहेस, असंही सांगितलं. पण मला तू बरी दिसत नाहीस. काय चाललय तुझ्या मनात हल्ली? मला कळत नाही."

यशच्या चेहऱ्यावरचे ते भाव बघून तिला गलबलून आलं. 'पण काय सांगायचं? आणि कसं पटवायचं?' मग ती काही न बोलता त्याच्या हाताला धरून तशीच बसून राहिली. मग म्हणाली, "काही होत नाहीय रे मला, पण शक्ती कमी पडतेय माझी." खरंच बोलत होती ती. "आपण एकदा डॉक्टरांशी बोलू, आणि नेहमीची सोडून इतर काही व्हिटामिन्स वगैरे घ्यायला हवीत का विचारू." यशने मान हलवली पण त्याचा या वेळेस तिच्या बोलण्यावर विश्वास बसला नाही.

या प्रकारानंतर मात्र जाई प्रचंड दडपणाखाली वावरू लागली. आपण आगीशी खेळतोय आणि नागिणीला पाळतोय हे तिला जाणवले. पण आता आर या पार एवढाच पर्याय होता. मधला मार्ग उरलाच नव्हता.

त्या वर्षातच पत्नीला दिवस राहिले तेव्हा दादासाहेबाच्या आनंदाला पारावार राहिला नाही. तो तिचे अधिकच कोडकौतुक करू लागला. त्याची पत्नी अत्यंत देवभक्त होती. वडिलांनी सांगितल्याप्रमाणे नामस्मरण करत राहिली. तिने लवकरच आपले बस्तान तळमजल्यावर हलवले. वरची खोली फक्त दादासाहेब वापरे. शेवंतास तो फक्त आपलाच असल्याची भावना काही अंशी शांत करी. एक दिवस सकाळीच अप्पासाहेब काही कामाने दादासाहेबाच्या खोलीत आला. पलंगावर त्याच्या शेजारी स्त्री दिसली. तो पट्कन परत जाण्यास मागे वळला. सूनबाई दरवाजा लावण्यास विसरली कशी, असा विचार मनात येतोय तोच पायातल्या पट्ट्यांचा, विस्मृतीत गेलेला चिरपरिचित आवाज आला. तो गर्रकन वळला. शेवंता दादासाहेबाच्या अंगावर नागिणीसारखी पसरली होती. अप्पासाहेबाची बोबडीच वळली. थरथर कापत तो धाडकन् कोसळला आणि क्षणात गतप्राण झाला. सगळे हळहळले. आता कुठे मुलगा-सून जवळ राहण्यास

आले होते पण सुखच नव्हते नशिबी. काही जणांनी ओटी न ठेवण्याचा परिणाम असाही अर्थ लावला.

पत्नीचे दिवस भरण्यापूर्वी तिला माहेरास पाठवणे आवश्यक होते, म्हणून दादासाहेब तिला सोडून आला. शेवंताला आता मालकीण झाल्यासारखे वाटू लागले. तिची आरशातील दुनिया वाडाभर फिरू लागली. चुकून एखाद्यास दिसू लागली. बातम्या गांवभर पसरू लागल्या. दादासाहेबास खरंतर याचा मागमूसही नव्हता, पण शेवंताने त्या वाड्यास पकडले असे गांव बोलू लागले. त्याची पत्नी मुलाला घेवून परत आली तेव्हा कुजबुज वाढली. आता शेवंता, हिचा बळी घेणार, असे सर्व आपसात बोलू लागले.

शिवाची आई एक दिवस म्हणालीच, “वैनीसाब ईकाची परक्सा काय हून बगावी? चला आपून शेवंताची वटी ठिवून येऊ.”

ओली बाळंतीण, घरात मोठं माणूस म्हणजे हीच शिवाची आई, मोठ्या बहिणीसारखी. तिला नाही म्हणवेना. मग दोघी जाऊन ओटी ठेवून आल्या. काही दिवस बरे गेले. काही दिवसांनी पत्नीने बस्तान वर हलवले. इतके दिवस बायकोची आतुरतेने वाट पाहणारा दादासाहेब, त्याला काय करू नी काय नको असे झाले. दोघे एकमेकांत जगाला विसरून गेले. आरशापलीकडे शेवंता दात ओठ खाऊ लागली. हातपाय आपटू लागली. शेवटी तिने संतापातिशयाने आरोळी ठोकली. अर्थातच जाईशिवाय तो आवाज इतर कुणाला ऐकू जाणारच नव्हता. दादासाहेबाच्या पलंगाशेजारील पाळण्यातील बाळ मात्र जोरजोरात रडू लागले. जाईचे काळीज चिरत गेले ते दोन्ही आवाज.

भाग ८

रोज नव्याने, मृतात्म्यांविषयीचे तिचे ज्ञान वाढतच होते. मृतात्म्यास इतर कोणासमोर यायचे असेल, तर प्रचंड कष्ट पडतात. त्याच व्यक्तीच्या शरीरद्रव्यांचा वापर करत त्याला आपली छबी निर्माण करावी लागते. मृत्यूसमयीची तीव्र भावना, इच्छा, याच त्यांच्या दीर्घकाल अस्तित्वास कारणीभूत ठरतात. जितकी भावना तीव्र, तितका तो अहम, त्या भावनेस चिकटतो. कालानुसार तो अधिकाधिक चिवट बनत जातो. ते मन, त्या तीव्र भावनेस घट्ट धरून ठेवते. कारण त्याचे संपूर्ण अस्तित्व त्यावरच अवलंबून असते. मग न संपणारे नरकयातनेचे हे अस्तित्व अबाधित राखण्यासाठी निकराची धडपड सुरू राहते.

जाईला मनुष्यस्वभावात आणि यांच्यात अधिकाधिक साम्य दिसू लागले. अहमच्या अस्तित्वाची धडपडच माणसाचे अख्खे आयुष्य व्यापून उरते.

दादासाहेब प्रचंड खुशीत होता. पत्नीचा सहवास त्याला सर्व बाजूंनी सुखावत होता. एक दिवस तो तिला म्हणाला की बग्गी मागवतो, मग भवानीमातेच्या दर्शनास जाऊ. ती बरं म्हणाली. तयार होण्यास वर खोलीत आली. लुगडी कपाटाच्या वर ट्रंकेत होती. ती उंच मेजावर चढली. ट्रंक घेऊन उतरू लागली. शेवंताने मेजास धक्का दिला. ती वरून ट्रंकेसकट खाली कोसळली. ट्रंकेचा वर्मी घाव बसला. जागीच जीव गेला. आवाज ऐकून सगळे धावत आले. दादासाहेब वेडापिसा झाला. कसाबसा शिवाच्या आईबापांनी सावरला. मग त्याने रावसाहेबास शिक्षणासाठी शहरी ठेवले. आपण जाऊन येऊन राहिला. केवळ पुत्रप्रेमाने त्यास जीवंत ठेवले. मुलगा मोठा होताच त्याचे लग्न लावून दिले पण त्यांनी शहरीच राहावे असे सुचवले. बरीच वर्षे

मंडळी शहरीच राहिली. रावसाहेब येऊन  जाऊन असे, पण पत्नी मुलगा सगळे शहरीच. यशचा जन्मही शहरातलाच. तो बराच मोठा होईपर्यंत वाडा पाहिलाच नाही त्याने. पण मग दादासाहेब वृद्धापकाळाने परावलंबी झाले तेव्हा यशसह मंडळी वाड्यात राहण्यास आली. दादासाहेबांनी विरोध दर्शवला. परंतु  त्यांची शारीरिक स्थिती पाहता त्यांना एकटे सोडणे शक्यच नव्हते. लवकरच त्यांचे निधन झाले. वाड्यात दादासाहेबाखेरीज फारसे कोणी राहत नसल्याने आपोआपच शेवंताचा विषय मधली काही वर्षे मागे पडला. गावात अजूनही ओटी प्रथा सुरू असली, तरी तिच्याविषयीच्या आख्यायिका सांगणारी मंडळी एक एक करून काळाच्या पडद्याआड गेली. वाड्यावर आपलेच राज्य, या विचारात तिचा मृतात्माही बहुधा त्या नरकयोनीतही काही काळ सुखावला. रावसाहेब आणि त्यांची पत्नी नेहमीच शहरात वाढलेले, नवीन पिढीतले, त्यामुळे त्या दोघांचा यावर विश्वास नव्हताच. यशला शिक्षणाच्या दृष्टीने गावात ठेवणे त्यांना योग्य वाटेना. मग यशने आणि त्याच्या आईने शहरी रहावे, रावसाहेबांनी येऊन जाऊन असावे असे ठरले. अशीही काही वर्ष गेली. शेवंताला कसलीच आडकाठी उरली नाही. तिचे आता सारे लक्ष रावसाहेबावर केंद्रीत होते. घरचा प्रत्येक पुरूष तिच्या दृष्टीने प्रेमपात्रच होता. त्यामुळेच भाऊसाहेब आणि अप्पासाहेब  वगळता इतर कोणाला ती दिसली नव्हती, ना तिच्यापासून काही धोका निर्माण झाला होता. मग एके वर्षी यश, त्याची आई, सुटीत वाड्यावर राहाण्यास आले. यशचे पुढील शिक्षण सुरू होणार होते. काही दिवस तिघे मिळून राहू या विचाराने ती दोघे आली होती. अर्थातच आल्यावर वाड्यात बरेच बदल करावेत असं यशच्या आईला वाटू लागलं. ‘रंगरंगोटी, नवं मॉडर्न फर्नीचर, थोडी रचनाही बदलूया,’ ती म्हणाली. रंगारी, सुतार,  सगळ्यांना बोलावणं गेलं. तिने काढून टाकण्याच्या फर्नीचरमधे वरच्या ड्रेसींग टेबलचा नंबर सर्वात वर टाकला. सगळ्यांना कामं समजावून झाली. पुढच्या आठवड्यात यश होस्टेलला गेल्यावर काम सुरू करायचं ठरलं. त्याच संध्याकाळी तिघे बग्गीराईडला बाहेर पडले. बग्गीवाल्याला गावाभोवती मोठी चक्कर मारायला सांगितले. बग्गी फिरत फिरत कलावंतिणीच्या पडीक कोठीजवळ आली. पडीक कोठी आणि जवळ कण्हेरीच्या फुलांनी सजवलेली शेवंताची मठी!

सगळे उतरून पाहूया म्हणाले. बग्गीवाल्याने बग्गी बाजूला घेतली. सगळे उतरून मठीजवळ आले. यशने, हे काय आहे असे विचारताच, बग्गीवाल्याने ऐकीव कथा सांगितली. यशची आई जोरजोरात हसू लागली.

"अरे कुठल्या जमान्यात वावरताय? कुणाची मालकी आहे या जागेवर?"

"आपल्याच ताब्यात आहे," रावसाहेब म्हणाले.

"अरे वा, मग छानच की. हे सगळं पाडून मस्त एक हॉटेल बांधू इथे. हायवे लवकरच जायचाय इथून. उत्तम चालेल".

रावसाहेबांनाही ही कल्पना पटली. बग्गीवाला मात्र मनातून घाबरला. पण तो बापडा काय बोलणार? सगळे घरी आले. शेवंता नामक नागिणीच्या शेपटीवरच पाय दिला होता या मालकिणीने. ती धुमसत होती. फुत्कारत होती. बदल्याची आग तिच्या मनमानसाला जाळत होती. जेवण करून रावसाहेब आणि पत्नी वर आले. कपडे बदलून पलंगावर आडवे झाले.

"हे ड्रेसींग टेबल, बाहेरचे ओव्हल टेबल, अँटीक म्हणून भरपूर पैसे मिळवून देतील, मला खात्री आहे. मी लवकरच माझ्या या क्षेत्रातल्या काही जाणकार मित्रमैत्रिणींना बोलावून घेते." पत्नी म्हणाली.

शेवंता पलंगाच्या अगदी जवळ उभी होती. आत्ता हिची मुंडी मुरगाळून टाकावी असा संतापी विचार तिच्या मनी येत होता. पण आपलं अस्तित्वच नाहीसं करायला निघालेल्या या अवदसेला अशी सहजासहजी नाही मरू द्यायची. झिजवून झिजवून मारीन. शेवंताने पणच केला.

जाईच्या अंगावर सरसरून काटा आला. प्रथमच, हे सगळं घडून गेलंय हे ती क्षणभर विसरली. कसं थांबवावं हे, हा विचार मनी आला. नेमकी तेव्हाच तिची नजर शेवंतावर पडली. असूरी आनंद या शब्दाचा शब्दश: अर्थ तिचे काळीज थरकापून गेला. यशच्या आईबरोबरच ती

जाईच्या ‘स्व’ला मारण्याचा प्रयत्न करत होती. जाईची अगतिकता तिला तिच्यावर नियंत्रण मिळवून देणार होती. जाई क्षणात सावध झाली. तिने मोठ्या पराकाष्ठेने मन अलिप्त केले.

चार दिवसांनी रावसाहेब यशला सोडायला शहरी गेले. यशची आई वर ड्रेसींग टेबलची पाहणी करायला गेली. तिने खोलीत प्रवेश करताच तिला कसली तरी प्रचंड दुर्गंधी जाणवली. काहीतरी भयंकर कुजले होते. एखादा प्राणी वगैरे मेलाय का? पण कालतर काहीच वास नव्हता. बाहेरून येत असेल कदाचित. असं म्हणून तिने दारे खिडक्या घट्ट बंद करून घेतली. मग तिने ड्रेसिंग टेबल नीट पाहायला सुरवात केली. साधारण दोन अडीचशे वर्ष तरी नक्कीच झाली असतील. तिने कयास बांधला. मग नीट निरखून पाहताना तिच्या लक्षात आलं की, आरशाची बांधणी, नक्षीकाम, लाकडाचा प्रकार हे उत्तम फिनीशिंगचे होते तर बाकीचे ड्रॉवर वगैरेचे काम ओबडधोबड वाटत होते. तिने, आरशामागचे कपाट उघडायला खाच होती, त्यात हात घातला तर तिच्या हाताला चिकट, बुळबुळीत असा द्राव लागला. तिने पटकन कपाट उघडले तसे शेवंताचे प्रचंड कुजलेले शव तिच्या अंगावर पडले. ती जोरात किंचाळली पण दारे खिडक्या बंद असल्याने आवाज बाहेर गेलाच नाही. ते शव एकदम अंगावर आल्याने तिचा तोल गेला. ती खाली आणि तिच्यावर शेवंताचे कुजलेले शव. भयातिशयाने ती बेशुद्ध पडली. बराच वेळ झाला तरी वैनीसाब कुठे दिसेनात म्हणून मग शिवा वर आला तर दरवाजा आतून बंद. “झोपल्या असत्याल, जरा येळानं येत्याल खाली” असं वाटलं त्याला. पण बराच वेळ झाला तरी त्या बाहेर येईनात तेव्हा मात्र तो घाबरला. त्याने दार वाजवले, हाका मारल्या, पण काहीच उत्तर नाही. मग मोठं टेबल आणून वर चढवलं बायकोला आणि म्हणाला “दाराच्या वर बारीक खिडकी हाय त्यातून बग काय दिसायलंय.” ती चढली. बघते तो वैनीसाबांचे पाय फक्त दिसायले वरून. “जमिनीवर झोपल्या काय जनू?” आता मात्र शिवा घाबरला. त्याने दोघा तिघांना बोलावून आणले. दरवाजा जोरजोरात ढकलून बिजागरी तोडल्या. दार उघडून आत आले सगळे. वैनीसाब आरशासमोर जमिनीवर पडलेल्या. अंग चेहरा संपूर्ण आक्रसलेला. शिवाच्या बायकोने पाणी

मारून उठवण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. मग उचलून पलंगावर ठेवले सर्वांनी तर अंग पार लुळं पडलेलं. अंग निखाऱ्याप्रमाणे भाजत होतं. रावसाहेब आले तोवर काही फरक नव्हता. गावचा डॉक्टर त्यांना बघून शहरात न्यायला लागेल म्हणाला. अती ताणाने डोक्यात रक्तस्त्राव झाला असावा असे त्याला वाटत होते. शहरातून डॉक्टरांना बोलावले पण अर्ध्या रस्त्यात गाडी बंद पडून ते पोहचूच शकले नाहीत. इकडे बायकोची ही अवस्था. मग आपणच गाडी घेवून निघावं असा विचार करून गावातील ड्रायव्हरला बोलावणे पाठवले तेव्हा तो शहरातच अडकला आहे कारण गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर झाडं पडून रस्ता बंद झालाय असं कळालं. पत्नी म्हणजे मांसाचा नुसता गोळा. काल जिच्याशी रत झालो ती ही? रावसाहेबास आयुष्यात इतके असहाय कधीच वाटले नव्हते. गावातील डॉक्टर, वैद्य, शिवाच्या सांगण्यावरून मांत्रिकसुद्धा बोलावला. शिवाच्या बायकोने गुपचुप ओटी नेऊन ठेवली. पण नागिणीने डंख मारून झाला होता. चार दिवस जेमतेम ती अशा अवस्थेत जगली. मांसाचा तापलेला गोळा. पाचव्या दिवशी झिजून झिजून प्राण गेला.

जाईच्या शरीरभर मुंग्या येताहेत असा भास झाला तिला. डोकं सून्न झालं. भय पुन्हा एकदा मनावर अधिराज्य गाजवणार हे तिच्या लक्षात आलं. ती उठली. ताजे मीठाच्या पाण्याने भरलेले बाऊल्स तिने जुन्यांच्या जागी भरून ठेवले. वाईट लहरींना शोषून घेण्यासाठी असे करतात असे अलीकडेच तिच्या वाचनात आले होते. आता शहानिशा करत बसायला तिला वेळ नव्हता. ज्यांने हानी नक्की नाही हे पटेल ते सर्व, परिणाम होतोय की नाही याचा विचार न करता, करायचे असे तिने ठरवले होते. तिला केव्हातरी यशच्या बोलण्यातून समजलेले संदर्भ आठवले. यशला रावसाहेबांनी मर्तिक झाल्याबरोबर शहरी जाऊन आईच्या मृत्यूबद्दल सांगितले. जरा ताप आला आणि तो डोक्यात गेला असे सांगितले. दुसरे काही त्यांना तरी काय माहीत. त्याने आता

वाड्यावर येऊ नये आणि स्वत:स जपावे असे सांगितले. वडिलांना असे हळवे होताना तो प्रथमच पहात होता. आई गेल्याचे दु:ख होतेच वर वडिलांची ही अशी हळवी अवस्था. त्या क्षणात तो कित्येक वर्षांनी मोठा झाला.

मग तो म्हणाला "बाबा, आता तुम्हीही सगळं विकून टाका. शहरात या. आपण एकत्रच राहू. आईला तेच आवडेल."

रावसाहेब अकाली प्रौढ झालेल्या आपल्या मुलाकडे पाहत राहिले. आपण सावरायला हवे हे त्यांना जाणवले. "शिक्षण होईपर्यंत हॉस्टेलवर रहा. मित्रांची संगत बरी या वयात. तोपर्यंत मी ही तिथले बस्तान हलवतो" रावसाहेब म्हणाले.

त्यानंतर यशने स्वत:भोवती एक अदृश्य कोटच बांधून घेतला. तिथे त्याने सगळयांना प्रवेश नाकारला. ना मित्र, ना मैत्रिणी. भयंकर शिष्ठ आहे असंच म्हणत सगळे. मुलींच्या मते देखणा, पण कोरडा, इनसेंसेटीव्ह. मग फारसे कोणी वाट्यालाच गेले नाही. तो त्या कोशात सेफ फील करायचा. कोणी फार जवळ यायला नको आणि मग ते अपरिहार्य दु:खही नको. लग्न-बिग्न करायचंच नाही हे ही त्याने त्या कोवळया वयातच ठरवून टाकले होते. जाईला बघेपर्यंत हे निश्चय कायम होते. तिच्या प्रथमदर्शनातच हा भक्कम बांधलेला कोट ढासळू लागला. जाई विचार करू लागली. ‘काय होतं असं आपल्यात? चारचौघीत उजवी असेन रुपाने पण सौंदर्यखणी नक्कीच नव्हे. यातही काही ऋणानुबंधच असावा का?’

भाग ९

जाईला सर्वच गोष्टींचा प्रथमपासून विचार करून पाहणे गरजेचे वाटू लागले. सर्व घटनांमधले कच्चे दुवे शोधून, त्यातील अर्थ समजावून घेणे गरजेचे होते. शेवंताचा पुढचा घाव कसा आणि कुठे असेल हे आता ओळखणे गरजेचे होते. हातात वेळ फार उरला नव्हता. कुठल्याही क्षणी काहीही घडण्याची शक्यता होती. तिचा जीव धोक्यात होता, होता का? वाड्याच्या इतर सुनांमधे आणि आपल्यामधे काय फरक आहे? आता सर्व गत इतिहास आपल्याला कळलाय, खरंच कळलाय का? अचानक तिला आपले सासरे आठवले. त्यांनी एवढ्या अजिजीने आपल्याला वाड्यावर जाण्यास का सांगितले? ते ही स्वत:च्याच पत्नीची झालेली भीषण अवस्था स्वत:च्या डोळयांनी पाहून? खरंच त्यांना बायकोच्या मृत्यूमधे काहीच अनैसर्गिक वाटले नसेल? प्रश्न, नुसते प्रश्न! आणि अचानक तिला सासऱ्यांचा घुसमटलेला आवाज आणि पाठोपाठ चलचित्र दिसू लागले.

वाड्यातील त्यांची शेवटची भेट असावी.

रावसाहेब वरील खोलीत झोपले होते. वाड्याच्या विक्रीचे सर्व नक्की होत आले होते. उद्या वकिलांसमोर सह्या झाल्या की संपले. अचानक त्यांना जाग आली. कोणीतरी अंगावरून हात फिरवतंय असा भास झाला. त्यांनी दिवा  लावून पाहिला तर कोणीच नव्हते. स्वप्न असावे असे वाटून ते परत झोपी गेले. परत तसाच भास. आता मात्र ते उठून बसले. शेवंता पायाशी बसली होती. "क...क... कोण तू? " त्यांची बोबडीच वळली. ती हळूहळू जवळ आली, परत हात

जवळ आला तसा तो रावसाहेबानी झटकण्याचा प्रयत्न केला. तिने तो पकडला, ते पलंगावर मागे मागे सरकू लागले.

ती छद्मी हसली. "तिला कसा कुरवाळत होतास? मला काय महारोग झालाय काय? कशी गत केली तिची पाह्यलीस ना? पण तू घाबरू नको, तुला नाही मारणार, तसंही तुझ्यात काय आहे? तुझा पोरगा तरणा मर्द आहे. पण येत नाही इथं. बायकोला चिकटून शहरात बसलाय. त्याला लावून दे इथं. आणि सुनेलाही. मी असताना वाड्याला नवी मालकीण नकोय. येवढ्यात नाही मारायची तिला. वंश वाढायला कोणी हवं ना? मी कशाच्या जीवावर रहावं नाहीतर? पोर होऊ द्या एक. मग बघू तिचं काय ते."

रावसाहेबांची बोबडी वळलेलीच राहिली.

मग त्यांच्या डोळ्यात भेदक पहात म्हणाली, "चुकवायचं नाही. लावून द्यायची. नाहीतर तुझ्या पोराला जिवंत ठेवणार नाही. आणि त्या आधी तुला संपवेन." एवढं बोलून ती नाहीशी झाली. रावसाहेबांनी ओरडण्याचा प्रयत्न केला पण आवाज बाहेर आला नाही. उठायला गेले पलंगावरून आणि धाडकन खाली कोसळले.

पुढचं सगळं जाईला माहीतच होतं. डावी बाजू पूर्ण निकामी झाली होती. निदान झालं 'पॅरॅलिसीस'. वकील बरोबर होताच त्याने सरळ अॅम्ब्युलन्स बोलावली आणि शहरात आणून हॉस्पिटलमधे अॅडमिट केले. काही दिवस तिथे काढल्यावर घरी पाठवलं. फिजीओ वगैरे घरीच सुरू झालं. जाई स्वत: जातीने लक्ष घालत होती. पोटची पोर करेल, अशी सेवा करत होती. ते सतत तिला शिवपुरी जाण्यास सांगत होते. रावसाहेब सतत रडत. ती त्यांना धीर देई. उमेदीने पुन्हा उभे राहण्यास सुचवे. हलकं, पौष्टिक अन्न, रुचकर बनवून थोड्याथोड्या वेळाने देई. रावसाहेब चिडत. तिला कधीकधी 'ऑफिसला निघून जा, मला त्रास देऊ नको' म्हणत. तिला आत्ता त्या सर्व गोष्टींचा अर्थ उमगत होता. एकीकडे स्वत:च्या जीवाची भीती, वर मुलाच्या जीवाची भीती, आणि मुलीसारखी सेवा करणाऱ्या सुनेला मृत्यूच्या तोंडी आग्रहाने पाठवत

असल्याची अपराधी टोचणी. मी जरा वाईट वागले असते तर त्यांची ही टोचणी कमी झाली असती कदाचित. जाईला मनुष्यस्वभावाचे राहूनराहून आश्चर्य वाटत राहिले. या टोचणीनेच जीव घेतला त्यांचा खरं तर. तिला वाटू लागले. अचानक शेवंता समोर दिसली... जणू म्हणत होती... बघ ही तुझी आपली माणसं... माझ्याकडे ढकलून गेला तुझा सासरा. आणि तू, वेडपट मला इथे येण्याचा तोडगा सुचवलास...

आणि अचानक जाईला पुढचा मार्ग दिसला. अत्यंत बिकट पण तो एकच मार्ग होता. आता जास्त विचार करायला वेळ नव्हता.

तिने भराभर फोन फिरवायला सुरूवात केली. प्रथम तिने घरच्या दोन्ही कामाच्या बायकांना येऊ नका म्हणून कळवले. मग यशची सेक्रेटरी, सोफीला फोन करून, तिला 'जरा बंद केबिनमधे जा मग बोलते' असे सांगितले.

तिने तसे केल्यावर जाई तिला म्हणाली, "सोफी, माझ्या लग्नाच्या आधीपासून आपण दोघी मैत्रिणी आहोत, आणि आपल्यात तेच नाते आहे, असं तुलाही वाटतं ना?"

सोफी बुचकळ्यात पडली. "व्हाट्स ऑन मॅन ?? तू असं का बोलतेस आज?"

त्यावर जाई म्हणाली "कॅन आय काऊंट ऑन यू सोफी इफ आय आस्क यु टू डू समथींग?"

"ऑफ कोर्स जाई. यु नो यु कॅन. पण आता लवकर सांग. आर यु इन ट्रबल? बॉसला सांगू का?"

"नाही नाही. हे फक्त तुझ्यामाझ्यात. त्याला काहीही सांगायचं नाहीय. फक्त आज पूर्ण दिवस आणि रात्र तो घरी येणार नाही ही जबाबदारी तुझी. काय वाट्टेल ते कर. कामं काढ, बाहेरगांवची मीटींग ठरव पण बॅग घ्यायलाही तो घरी येता कामा नये. त्याच्या आणि माझ्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. वेळ पडलीच तर युज युवर चार्म सोफी, पण तो घरी येता कामा नये."

"आर यु आऊट ऑफ युवर माईंड जाई? बॉस आधी थोबाडीत मारेल मला. नक्की काय झालय? मी आत्ता अशीच जाऊन बॉसला सांगतेय."

"नो नो सोफी, आय मीन, त्याला येऊ न देणं इतकं महत्वाचं आहे की त्यासाठी जे करावं लागेल ते कर. शपथ आहे माझी तुला. माझ्यावर विश्वास आहे ना? मग एवढं कर. त्याच्या जीवाला धोका होऊ शकतो. प्लीज, यु आर द ओन्ली वन हुम आय कॅन ट्रस्ट. प्लिज प्रॉमिस मी की तू हे करशील?"

"येस आय प्रॉमिस जाई!"

जाईने लगेच फोन कट केला. ती सरळ उठून स्टडीमधे आली. तिने दरवाजा लावून घेतला. मग ती आरशासमोर जाऊन उभी राहिली आणि तिने शेवंताला हाक दिली.

ती म्हणाली, "मला माहीत आहे की तू मला पाहते आहेस, ऐकते आहेस, तर आज आपण बोलुया, तुझी संमती असेल तर समोर ये."

काहीही झाले नाही. मग ती म्हणाली "तुझ्या मनी मला मारून टाकायचे आहे. प्रथम तू माझ्या मनावर कब्जा करण्यासाठी आरशात सर्व घटना मला दाखवायचीस जेणेकरून माझं मन प्रचंड दडपणाखाली येईल आणि तू त्यावर कब्जा करशील. पण हळूहळू मन-एकाग्रतेच्या कारणाने मलाही भूतकाळ कळू लागला. त्यातून मला एक कळलं की, तू निदान माझ्याबरोबर खोटेपणा करत नव्हतीस. मला मारून टाकलेस किंवा टाकू शकलीस, तर तुझे नुकसान होईल. मला मात्र तुझी सुटका करायची आहे."

प्रचंड आवाज करत वरचा सिलींग फॅन धाडकन खाली आला. जाईपासून काही अंतरावर पडला. जाई किंचित हसली आणि म्हणाली, "तुझा राग मला कळतो, ही कोण मला सोडवणारी असं वाटतय तुला. आणि ते खरच आहे. जोपर्यंत तू स्वत: तुझी सुटका या

नरकयोनीतून करून घेण्याची इच्छाच मनी आणत नाहीस, तोपर्यंत कोणीच काही करू शकत नाही. पण आज तुला माझे म्हणणे ऐकून घ्यावेच लागेल. मला मारून टाकलेस, तर तुझा सुटकेचा मार्ग तर बंदच होईल पण ज्या इर्षेने तू आजतागायत हे सर्व करत आलीस, ते करण्याचे ठिकाणच तुला उरणार नाही. माझ्या मृत्यूबरोबर हे घराणे नष्ट होईल. यशबरोबर तू काही काळ व्यतीत करशीलही पण नेहमीप्रमाणे त्यातही तू एकटीच असशील. तो नसेल."

जोरजोरात पाय आपटण्याचा आणि एखादे श्वापद जसे संतापाने हुंकार भरते तसा आवाज येऊ लागला. ही एक पावतीच होती की जाईचे बोलणे ऐकले जात होते आणि समजतही होते.

"आता मी काय बोलते ते नीट ऐकून घे. तुझ्याबरोबर जे घडले, ते अत्यंत लांछनास्पद होते. आमच्या घराण्याच्या पुरूषांनीच हे केले, याचा मला अतोनात खेद आहे. ऐन तारुण्यात प्रियकराने केलेली प्रतारणा, वर त्याच्याच बापाने केलेला अत्याचार, अनवधानाने झालेला तुझा खून, हे सर्वच फार भयंकर होतं. परंतु त्याहूनही भयंकर होता, तुला पहावा लागलेला तुझ्या प्रियकराचा त्याच्या पत्नीबरोबरचा श्रृंगार, त्यानंतर त्याने तुझ्या आईबरोबर तिच्या अगतिकतेचा फायदा घेत केलेला संग."

आतून एक खोल किंकाळी आणि हुंदका ऐकू आला.

जाई बोलायचे क्षणभर थांबली. "तुझ्या मनात सुडाची ठिणगी पेटणे अगदीच स्वाभाविक होते. पुढे त्याचा सुडाग्नी झाला, पण नंतर मात्र, तुझ्या मनात राहून गेलेली, शरीरसुखाची इच्छा, आणि मालकी हक्काची भावना, हीच प्रामुख्याने तुझ्या मनावर आरूढ झाली, आणि मग ज्यांनी तुझ्यावर अन्याय केला त्यांना सोडून तू घराण्यातल्या स्त्रियांच्या मागे लागलीस. त्यांचे बळी घेत गेलीस आणि पापाची धनीण बनलीस. त्यांचे मृत्यू अटळच होते. तू कारणमात्र ठरलीस. पण तुझा अहंकार इतका वाढला की तुला वाटलं आपण काहीही करू शकतो. तू कारणमात्र होतीस शेवंता. माझी आजेसासू म्हणाली ते अगदी खरं. प्राक्तनात जे असेल ते घडतंच.

तिचाही मृत्यू हा तसाच होता, इतरांचाही. पण फरक एवढाच की बाकीच्यांच्या मनाला तू कह्यात घेवू शकलीस, एकीच्या मनाचा पूर्ण ताबा घेतलास आणि तिच्याकरवी तू स्वत:ला हवे तसे वागून घेतलेस. माझ्या सासूबाईंच्या मनात मात्र फक्त एवढाच शिरकाव केलास की, तू दाखवलेलं भीषण दृष्य त्या खरं समजून जगल्या. भयाने शरीर कोलमडलं त्यांचं."

अचानक शेवंता अक्राळविक्राळ रुपात आरशात दिसू लागली. तिचा हात बाहेर आला आणि जाईच्या गळयाला पकडायला पुढे झाला. पण तिला गळा पकडता येईना.

"फॅन निर्जीव आहे शेवंता. त्यावर अधिकार गाजवणे सोपे. काही अनीष्ट शक्तीही तुला साहाय्यभूत झाल्या असतील. पण सुजाण मनाला कह्यात घेणे फार सोपे नव्हे. शक्ती वाया घालवू नकोस. ह्या अहंकाराने बराच उत्पात माजवला आहे. आता पुरे."

फट्कन ती दिसायची बंद झाली.

“आता, मी तुझ्या मनाला, योग्य मार्गावर घेवून जाणार आहे. निदान तसा प्रयत्न तरी करणार आहे. जशी तू या सर्व उत्पाताला निमित्तमात्र ठरलीस तसाच माझाही सहभाग निमित्तापुरताच आहे, हे मी जाणून आहे. मी माझ्या जीवाचंच दान टाकलंय. त्यामुळे मला मृत्यूची भीती दाखवू नकोस. ज्यांना तू मारलंस असं तुला वाटतंय त्यांचे मृत्यू अटळ होते. दुसरे असे की, काहींना तू तुझ्या सापळयात अडकवू शकलीस. उदा. आप्पासाहेबाची पत्नी, माझ्या सासूबाई. मलाही प्रथम तू अडकवलेस. माझ्याच मनात शिरून मलाच कैद करण्याचा प्रयत्न केलास, पण तुझे आणि माझे सौभाग्य, ते फार काळ टिकले नाही. या घराण्याच्या पुरूषांचा अट्टाहास सोड. मार्गस्थ हो. मनुष्य जन्म केव्हा मिळेल कोण जाणे पण प्रथम या योनीतून सुटका करून घे. ज्या योनीत मिळेल त्या योनीत जन्म घे. पण परत मर्त्ययोनीत ये. स्वत:च्या मनापासून ते सूक्ष्म शरीर मुक्त कर. आपोआपच, त्याबरोबरच्या इच्छा तुला पुढे जाण्यात अडथळा बनणार नाहीत. सूडभावनेपासून मनास मुक्ती दे. तुझ्या पवित्र आत्म्याचा शोध घे. वरील दोन गोष्टी केल्यास तर तो तुला मिळेलच असे मला वाटते. हे करणेही तसे सोपे नाही. पिळ घट्ट आहे. जाळून टाकलास,

मुळापासून उपटलास तरच मुक्ती मिळेल. नाहीतर परत परत फिरून गुंतत जाशील. आतापर्यंत आमचे घर होते धरून ठेवायला. पण आता ना हा वाडा उरणार ना आम्ही. काही वर्षात आम्ही दोघे जाऊ. किंवा तू आम्हाला संपवशील, जर योग तसाच असेल तर. पण मग तुझी अवस्था दोर तुटलेल्या पतंगासारखी होईल. अधिक अधिक भरकटत जाशील." शेवंता गरागरा जाईभोवती फिरू लागली. भयंकर आवाज काढू लागली. पण ते जाईला घाबरवण्यापेक्षा, तिची अगतिकताच दर्शवत होते. हे प्रथमच घडत होते की, दुसरे कोणी तिच्या मनावर काही बिंबवू पहात होते.

"नुसत्या मनाच्या इच्छेला आणि तिच्या पूर्ततेला काय अर्थ आहे? मर्त्य योनीत प्रवेश कर, जिथे इच्छेचा उपभोग घ्यायला शरीर असेल. तुझ्यासाठी मी, आता त्या सर्वव्यापी शक्तीस आवाहन करून प्रार्थना करणार आहे. तू त्यात सहभागी झालीस तर उत्तमच. नसेल शक्य तर अडथळा बनू नकोस." असे म्हणून जाईने पद्मासन घालून मन एकाग्र केले. शेवंताचा धीर सुटू लागला. पुढच्या अनोळखी प्रवासाची धास्ती वाटू लागली. मन आहे त्यालाच घट्ट धरून ठेवण्यास आसुसले. तिने जाईला यातून उठवण्याचा आणि परत कह्यात घेण्याचा चंग बांधला.

यश कितीतरी वेळ, कॉन्फरन्स कॉलमधे बिझी होता आणि तो तसाच रहावा अशी प्रार्थना सोफी करत होती. जाईला तिने प्रॉमिस केले खरे, पण आपण कसे यशला थांबवणार, हे काही तिला समजत नव्हते. पण लवकरात लवकर काही करणे गरजेचे होते. मग तिने भराभर काळजी बाजूला ठेवून डोकं वापरायला सुरवात केली. बरेच नवे क्लायंट्स, यशबरोबर मिटींग करण्याची वेळ मागत होते. त्यातल्या काही प्रॉमिसींग क्लायंट्सना तिने ‘प्रत्यक्ष भेट होणे कठीण आहे एवढ्यात, पण आज फोनवर भेटतील’, असे सांगितले. ‘फ्री झाले की मीच फोन जोडून देईन ’, असेही सांगितले. संध्याकाळचे पाच वाजत आलेच होते. दोन कॉल्स म्हणजे किमान दीड दोन तास. मग तिने एका खूप महत्त्वाच्या पदावर असणाऱ्या माणसाबरोबर डिनर मिटींग फिक्स केली. याची बायको यशवर लटटू होती. यशला तिचा तिटकारा होता. त्याचे इन्व्हीटेशन यशला

मेल केले आणि तो ॲक्सेप्ट करतोय असा मेलही. तो वाचल्यावाचल्या फोनवर बोलताबोलताच यश खुर्चीत उभा राहीला आणि रागारागाने सोफीकडे पाहू लागला. तिने खांदे उचलून अगतिकता व्यक्त केली आणि आज येण्यासाठी त्या माणसाने अल्टीमेटम दिल्याचे यशला मेलवर सांगितले. मग गडबडीने जाईला निरोप दिल्याचेही सांगितले. चला, म्हणजे रात्री ११पर्यंत तरी चिंता नव्हती. पुढचे पुढे पाहू. असा विचार करून, यशचा चालू फोन कॉल संपण्याची ती वाट पाहू लागली.

सोफी, गरीब ख्रिश्चन कुटुंबातील मुलगी. ग्रॅज्युएट झाल्याझाल्या, यशच्या ऑफिसमधे नोकरीला लागली. जोसेफच्या, यशचं ऑफिस सुरू झाल्यापासूनचा त्याचा सेक्रेटरी, ओळखीने आली, म्हणून यशने नोकरीला लावून घेतली. पण लवकरच ती ॲसेट बनली. एक तर तिला नोकरीची अत्यंत गरज होती. काम शिकून घेण्याची आवड होती. मग जाई आली आणि सोफीने लवकरच तिचेही मन जिंकले. लहान मुलासारखा निरागस स्वभाव, कामात हुशारी आणि उत्साह, आणि या दोघावर प्रचंड भक्ती. जाईला या आणीबाणीच्या क्षणी तिची आठवण येणे अगदीच स्वाभाविक होते.

प्रथम, जाईला आपल्या अंगभर मुंग्या फिरताहेत, असा भास झाला, पण अनुभवाने हे काय आहे हे जाणून तिने दुर्लक्ष करत, परत मन एकाग्र केले. काही वेळाने तिला सर्व अंगभर आग होवू लागली. ती ही जाणीवपूर्वक मनावेगळी करत तिने परत एकाग्रता साधली. काही काळाने अनेक हिंस्त्र श्वापदांचा, आसपास फिरण्याचा, ओरडण्याचा आवाज येऊ लागला. तरीही ती बधत नाही म्हटल्यावर तिला खोलीत पाणी शिरत असून ते वरवर चढत पार गळ्यापर्यंत आल्याचा भास होऊ लागला. काही क्षण जाईला आपला जीव जाणार असे वाटले. श्वास गुदमरतोय, असं वाटू लागलं. मन निश्चयापासून हटू लागले पण मग ती तयारी केलीच होती मनाची असा विचार करून तिने एकाग्रता कायम केली. जाईला मनाची एकाग्रता टिकवून ठेवणे जेवढे जड जाऊ लागले

तेवढाच तिचा निश्चय पक्का होत चालला. हे सर्व भास निर्माण करेपर्यंत शेवंताची शक्तीही संपत चालली. तिची अस्तित्वासाठीची धडपड, कित्येक पटींनी वाढली. रात्र चढत होती.

डिनर मिटींगही संपण्याच्या मार्गावर होती. यशने सोफीवर कधी नव्हे ते तोंडसूख घेतले होते, पण ते अपेक्षितच होते. या माणसाच्या लोचट बायकोचा त्याला किती पराकोटीचा तिटकारा आहे हे ती जाणून होती. पण इतका वेळ तरी प्रॉमिस टिकवून ठेवले याचा आनंद होता. पण आता पुढे काय? तरी डिस्कशन्स लांबवत तिने बारापर्यंत ही मिटींग ताणली होती.

यश सारखे घड्याळ पहात होता. शेवटी त्याने जाईला फोन करण्यासाठी मोबाईल उचलला, तेव्हा सोफी पट्कन म्हणाली, ‘तासाभरापूर्वीच आमचे बोलणे झाले. जाई लवकर झोपते म्हणालीय’.

त्याला जरा आश्चर्य वाटले. मला कसा नाही केला फोन? झोपली असेल आता, नको डिस्टर्ब करायला, असा विचार करून तो गप्प बसला.

मिटींग संपवून दोघे निघाले.

“सोफी तुला घरी सोडून मी पुढे जातो. एवढ्या रात्री टॅक्सीने नको,” यश म्हणाला.

तिचा जीव भांड्यात पडला. नाहीतरी ती म्हणणारच होती, ‘मला घरी सोडा बॉस.’

जसजसं तिचं घर जवळ येऊ लागलं, तसतसं तिला काही सूचेना. ‘आता काय करावं? कसं थांबवावं?’

तिची बिल्डींग आली. यशने गेटमधून आत गाडी घेतली. मग म्हणाला “वर पोचलीस घरात की कॉल कर, मग मी जातो.”

'आता काय करावं, कसं थांबवावं' असा प्रश्न पडला. मग म्हणाली "मला जाईबद्दल जरा बोलायचय."

यशचे डोळे बारीक झाले. "जाईबद्दल काय?"

“इज शी ऑलराईट?"

"का, असं का विचारतेस? " आणि मग तिने सरळच तिचे जाईबरोबर झालेले बोलणे त्याला सांगितले.

यशच्या चेहऱ्यावर, आश्चर्य, संताप, काळजी, हजार भावना उमटल्या आणि पुढे एक क्षणही न थांबता त्याने सोफीसकट गर्रकन गाडी वळवून रस्त्याला लागला.

"सोफी, तुझी ही मैत्रिण मला एक दिवस वेडं करणार. काय चाललय तिच्या डोक्यात? काही कळत नाही मला. मला परत एकदा तुमचं बोलणं नीट सांग."

जाई एकाग्रतेच्या परमबिंदूपर्यत पोहोचू लागली. शेवंता निकराने तिचा निश्चय मोडण्याचा प्रयत्न करू लागली. मधेच घरात काही धडाधडा पडण्याचा आवाज आला. पाठोपाठ धरणीकंप व्हावा तसा सगळा जमिनीपासून भिंतींचा भाग हादरू लागला. जसजशी जाई एकाग्रतेच्या टोकावर पोचत होती, शेवंता हवालदिल होऊन उत्पात माजवण्याच्या हेतूने आभास निर्माण करत होती. जाईचे मन त्यात गुंतते, तर तो आभास खरा ठरला असता. पण तसे न होता शेवंताचे मन गाठी सोडू लागले. शेवंता पार हादरून गेली.

यशने गाडीचा स्पीड जराही कमी न करता सोफीचे बोलणे नीट ऐकले. 'आमच्या जीवन मरणाचा प्रश्न? म्हणजे काय?' त्याचा श्वासोच्छ्वास जलद गतीने होऊ लागला. सोफीच्या

कानफटात मारावी अशी इच्छा झाली त्याला. पण शेवटी तिच्यामुळे आत्ता तरी कळले होते. 'युज युवर चार्म? हेच ओळखलस का मला जाई? मनात खोल एक कळ उमटली.' गाडी आता काही मिनिटांच्या अंतरावर होती घरापासून. यशला ती तासांएवढी वाटत होती.

जाई एकाग्रतेच्या परमशिखरापर्यंत पोहोचली. इथे सर्व शांत होतं. साधा एक तरंगही नव्हता. तिला आपले सर्वच पूर्वज एकत्रच दिसू लागले. आणि शेवंताही. जणू नाटक संपल्यावर नायक, खलनायक, सगळेच एकत्र बसून चहा पितात तसे. आत्म्याला काळवेळाची बंधने नसतात, भौतिक अंतराची बंधने नसतात, हे वाचलेल्याचा अर्थ प्रत्यक्षात दिसू लागला. तिच्यातील मूळ शक्तीतत्त्व आणि इतरांतील शक्तीतत्त्व एकच आहे याची आतून जाणीव उमलली. शेवंताविषयी फक्त अपरंपार प्रेमाने मन भरून आले. त्याच क्षणी कैदाशिणीसारख्या भडकलेल्या शेवंताने करकचून जाईची मान आवळली. जाईच्या स्पर्शाने, शेवंता शांत शांत होत गेली. तिचा सर्व द्वेष, संताप, मत्सर क्षणात कुठल्या कुठे भिरकावले गेले.

सगळे आभास संपले. मनाला चिकटलेले हे सर्व थर नाहीसे होताच, शुद्ध स्वरुपातील मन पंचतत्त्वात विलीन होण्यास आसुसले. पहाता पहाता विलीन झाले. तिच्या अस्तित्वाची शेवटची खूणही शिल्लक राहू नये असा संकेत असावा. ती विलीन होत असतानाच यश धाडकन् दरवाजा तोडून आत आला. त्याचबरोबर त्या आरशाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. त्याने आत येताच जाईला असे बसलेले पाहिले. तो चट्कन तिच्याजवळ गेला. तिने हात वर केला. त्याच्या हाताच्या सहाय्याने ती उभी राहिली. कित्येक तास पद्मासनात बसल्याने, भौतिक शरीर कुरकुरू लागले होते. पण तिच्या चेहऱ्यावरचे शांत, समाधानी, आनंदी भाव पाहताना, तो आश्चर्यचकितही झाला आणि आश्वस्तही झाला. पूर्वीची, आपली जाई परत मिळाल्यासारखं वाटलं त्याला. पाठोपाठ आलेल्या सोफीला पूर्ण विसरून त्याने जाईला मिठीत घेतले. जाईही कोणत्याही भयाशिवाय कित्येक दिवसांनी त्याच्या मिठीत विसावली.

मग हाताने खूण करून तिने सोफीला जवळ बोलावले आणि म्हणाली "थँक यू सोफी".

मग अचानक यशला आठवले, तो डोळे फिरवत म्हणाला "येस, थँक यू सोफी, फॉर नॉट युजींग युवर सो कॉल्ड चार्म".

सगळेच हसू लागले. कित्येक दिवसांनी जाईच्या खळखळून हसण्याने घर आणि यशचे मन भरून गेले.

सकाळी शेजारची चिमुरडी शिरीन सांगत आली, "आन्टी, माझ्या गच्चीत बुलबुलने घरटं केलं होतं ना, त्यातल्या अंड्यातून बेबी बुलबुल बाहेर आलं." जाईच्या ओठांवर एक वेगळंच हसू उमटलं.

__समाप्त__

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा

अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान